म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ...ना.वा...
दा. क्र. २६९६
BVBK-0402696

बा. वा
२९८६
२२।८।८२

# भारत-भारती

## भाग : ३

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. २९८६ दिनांक २२।८।८२
विषय बा. वा. क्र. ..........

पंढरीनाथ रेगे

BVBK-0402696

विविध बुक सर्व्हिस
पुणे ३०

प्रकाशन क्र.७

प्रकाशक
दि.वि.जोशी
विविध बुक सर्व्हिस
७९०, सदाशिव पेठ
"साईकृपा" पुणे ३०

© प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ती : फेब्रुवारी १९९२

टाईपसेटिंग
प्रमोद प्रिंटर्स
प्रमोद वि.बापट
११२०, सदाशिव पेठ
निंबाळकर तालीमचौक, पुणे ३०

मुद्रणस्थळ
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि.बापट
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०

मूल्य : भाग १ ते ४ एकत्रित मूल्य ऐंशी रुपये

---

*'भारत-भारती' या पुस्तकमालेतल्या विविध विषयांची माहिती मिळवण्यासाठी इतर काही ग्रंथांखेरीज 'भारतीय संस्कृती कोश' प्रामुख्यानं उपयोगी पडला ही गोष्ट आवर्जून नमूद करायला हवी.*

– लेखक

# अनुक्रमणिका

उज्जैन.
औषधी.
एरण.
आंतर-भारती.
कन्नड संतकवी सर्वज्ञ.
गुरुकुल.
शिखांचा धर्मग्रंथ : 'गुरुग्रंथ'
गुरुदक्षिणा.
गुरुद्वारा.
गुरुपौर्णिमा.
गुरुमुखी लिपी.
गोकुळ.
चामुंडराय व बाहुबलीची भव्य मूर्ती.
संत चोखामेळा (चोखोबा)
चौदा रत्नं.
चौदा विद्या.
जातककथा.
सिंहासनबत्तिशी.
मानससरोवर.
नवरत्न.
नवरस.
नवनाथ.
विवेकसिंधू.
नवरोज (पारश्यांचा पाडवा)
नांदी
नाच गी घुमा.

भरतवाक्य.
ब्रह्मगिरी.
भेंड्यांचा खेळ.
भस्त्रा (चामड्याची नौका)
भास्कराचार्य.
भीमगोड तीर्थस्थान.
भीमताल तीर्थस्थान.
भूपाळी.
भूर्जपत्र.
निसर्गसुंदर भेडाघाट.
भोजपूर.
मंगलाष्टक.
वृंदावन.
हेमाडपंती देवालयं.
धर्मचक्रप्रवर्तन.
धवलगिरी.
धाराशिव लेणी.
नगारा.
संत नरसी मेहता.
हिंदी भक्तकवी नरहरी.
बलुतेदार.
महान संस्कृत कवी बाणभट्ट.
अप्रतिम बादामी शिल्प.
बृहत्कथा.
बोरन्हाण.
तंपुरान कुंचीक्कुट्टन (केरळ व्यास)
शिखांचे चार मुख्य तख्त.
तमसा नदी.
महाबलिपुरम्.
वेल्लोरचा नमुनेदार दुर्ग.
उंच पहाडावर बांधलेला दुर्ग.
तक्षशिला-आद्य व श्रेष्ठ विद्यापीठ
तुणतुणं.
तुतारी.
तेन्नालीराम.
दंतकथा.

म. वं. सं. कर्वे, वाचनालय [illegible]
बाल वाङ्मय विभाग.
क्र. २६९६ दिनांक २२।११।८२
विषय बा.वा. ... क्र...........

## उज्जैन

मध्य प्रदेशातील उज्जैन हे शहर प्रख्यात आहे. याला उज्जयिनी असंही म्हणतात. अवंती हे याचं जुनं नाव. स्कंद पुराणात असं म्हटलं आहे की, शंकरानं या ठिकाणी त्रिपुरासुरावर विजय मिळवल्या- वरून या स्थानाला उज्जयिनी असं नाव पडलं. तर सम्राट अशोकाच्या एका शिलालेखात या नगरीचा उल्लेख उजेनी असा केलेला आहे.

क्षिप्रा नदीच्या तीरावर वसलेलं हे शहर भोपाळपासून ११३ मैल अंतरावर आहे. इथलं महाकाल मंदिर विशेष प्रसिद्ध आहे. पाच मजल्यांच्या या मंदिरातला एक मजला जमिनीखाली तळघरासारखा आहे. इथलं शिवलिंग ओंकारेश्वर म्हणून ओळखलं जातं. इथलं शिवलिंग भलंमोठं असून नागानं वेढलेलं आहे.

उज्जैनमधे सिद्धवट म्हणून एक यात्रास्थान आहे. वडाचं हे झाड आकारानं खूपच लहान असून कित्येक वर्षांत त्याच्या आकारात बदल झालेला नाही, असं सांगतात.

महाभारतकाली सांदिपनी ऋषींचा आश्रम या नगरीत होता. कृष्ण, बलराम व सुदामा या तिघाजणांनी लहानपणी याच आश्रमात राहून अध्ययन केलं होतं.

इसवी सनाच्या चौथ्या शतकाअखेर, पूर्वीच्या शकांची राजवट

उलथून पाडून चंद्रगुप्त विक्रमादित्यानं माळव्यावर आपलं राज्य स्थापलं. त्यानंतर उज्जयिनी नगराची बरीच भरभराट झाली. वैदिक, बौद्ध व जैन या तिन्ही धर्मांचं ते शिक्षणकेंद्र होतं. ज्योतिषविषयक शिक्षणासाठी हे नगर विशेष प्रसिद्ध होतं. गुप्तकाळात इथं संस्कृत काव्य व नाट्यशास्त्र यांचं उच्च शिक्षण दिलं जाई. कालिदास व भवभूतीसारखे महाकवी इथं काही काळ राहिल्याची आख्यायिका सांगितली जाते.

इ.स. १६८६-१७४३ या काळात होऊन गेलेल्या महाराज जयसिंहानं इथं एक वेधशाळा उभारली आहे. ज्योतिषशास्त्रातील या विद्वानाला ज्योतिषशास्त्राबद्दल कळकळ होती.

बारा वर्षांच्या अंतरानं इथं कुंभमेळा भरतो.

संस्कृत महाकवी कालिदास यानं आपल्या 'मेघदूत' या महाकाव्यात उज्जयिनीबद्दल आपली आवड व्यक्त केली आहे.

सध्याचं उज्जैन शहर प्राचीन काळच्या उज्जयिनीच्या स्थानापासून थोडं दूर वसलेलं आहे. जुनी उज्जयिनी सध्या ओसाड पडली असून तिला गढ म्हणतात.

## औषधी

वनस्पतींमध्ये औषधी वनस्पती व साधी वनस्पती असे दोन प्रकार असतात. म्हणजेच औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पती व तसे गुण नसलेल्या वनस्पती. निरनिराळ्या औषधींचे संशोधन व चिकित्सा करून विविध रोगांवर त्यांचे उपचार करून पाहण्याचे प्रयोग वैदिक काळापासून होत आले आहेत. ऋग्वेदात औषधींबद्दलचं सूक्तही आहे. त्यात रोगनिवारणासाठी व आरोग्यवृद्धीसाठी औषधींचा उपयोग करण्याबद्दलचे प्रतिपादन केलेले आहे.

प्राचीन काळी पुनर्वसू आत्रेय म्हणून भरद्वाजाचा शिष्य होता. तो मोठा औषधी संशोधक होता. औषधींच्या संशोधनासाठी तो हिमालयात हिंडत असे. अशा वेळी पुष्कळदा तो काही ऋषीही आपल्याबरोबर घ्यायचा. बौद्ध काळात स्थापन झालेल्या काही विद्यापीठांतून आयुर्वेदाचं अध्यापन चाले, तसंच औषधींचं संशोधनही चालत असे. तक्षशिला इथं असलेलं विद्यापीठ या बाबतीत अग्रेसर होतं. राजा बिंबिसार याचा जीवक नावाचा राजवैद्य होता. तो तक्षशिलेतील विद्यापीठात राहूनच औषधींविषयींचं ज्ञान संपादन करून आला होता. त्याची एक गोष्ट लक्षणीय आहे ती अशी—

'औषधी नसलेली एखादी वनस्पती मला आणून दे,' असं गुरूनं एकदा त्याला सांगितलं.

जीवक त्यासाठी बराच हिंडला. पण औषधी नसलेली एकही वनस्पती त्याला कुठं आढळली नाही. त्यानं परत येऊन खेदानं तसं गुरूला सांगितलं. हे ऐकून गुरू उलट खूष होऊन उद्गारला, "आता तू खरा वैद्य बनलायस्."

पाणिनी या आद्य व्याकरणकाराच्या काळात औषधी गुणधर्मानुसार औषधी वनस्पतींना वेगवेगळी नावं दिली जात. पाणिनीच्या 'अजादिगण' ग्रंथात त्रिफळेचा उल्लेख आला असून पतंजलीच्या महाभाष्यात ब्राह्मी या औषधीविषयी संदर्भ आलेला आहे.

## एरण

मध्य प्रदेशातल्या सागर जिल्ह्यात एरण नावाचं गाव आहे. पुराणवस्तूसंशोधकांना या ठिकाणी इसवी सनापूर्वीच्या तीन-चार शतकांच्या काळातली जुनी नाणी, पडक्या देवळांचे अवशेष, विष्णू

आदी काही देवतांच्या प्रचंड भग्न मूर्ती सापडल्या आहेत. याशिवाय प्राचीन काळचे काही शिलालेख व स्तंभलेखही आढळले आहेत. त्यांत सातवाहन राजवटीतले व गुप्त राजवटीच्या काळातले शिलालेख व शिल्पं आहेत. या गावाचं जुनं नाव 'एरिकिण' असावं असं जुन्या नाण्यांवरच्या नोंदीवरून दिसतं.

सव्वाशेएक वर्षांपूर्वी कनिंगहॅम या ब्रिटिश जनरलला या ठिकाणच्या बीना नदीच्या काठी एका शिवलिंगावर एक कोरीव लेख आढळला. तो होता इ. स. ५१० या सालचा. याच शिवलिंगाच्या खाली अष्टकोनी, सोळाकोनी व शेवटी गोलसर असलेला एक स्तंभ असून तीसेक वर्षांपूर्वी या स्तंभाच्या अष्टकोनी भागावर तीन लेख आढळले. हा लेख संस्कृत असून तो शकवंशी श्रीधरवर्मा याचा आहे. तो ३६५ साली कोरलेला असावा, असा तर्क म. म. वा. वि. मिराशी यांनी केला आहे. सत्यनाग यानं आपणास 'महाराष्ट्र' म्हणजेच महाराष्ट्रीय म्हणवीत असल्याचं या लेखावरून दिसतं. इ. सनाच्या ५ व्या व ६ व्या शतकातल्या काही ग्रंथांत महाराष्ट्र हा देशवाचक शब्द गणलेला आढळतो. पण श्रीधरवर्माचा सदर लेख ४ थ्या शतकातला असल्यानं महाराष्ट्राचा हा उल्लेख आधीचा ठरतो.

## आंतर-भारती

भारतातील विविध प्रांतांतील निरनिराळ्या जाती-धर्मांच्या लोकांत बंधुत्वाची भावना जागवावी आणि विविधतेतून एकत्व साधावं, असा ध्यास सानेगुरुजींना लागलेला होता. त्या ध्यासाच्या पूर्ततेसाठी त्यांनी आंतरभारती या संकल्पनेचा प्रचार आरंभलाही होता. ..र त्यांच्या

निधनानंतर त्यांचं हे स्वप्न साकार करण्याच्या हेतूनं 'आंतर-भारती' नावाची संस्था त्यांच्या अनुयायांनी स्थापली. भारतातल्या सर्व घटकराज्यांत सांस्कृतिक सहजीवन साधावं, हे या संस्थेचं मुख्य कार्य. विविध भारतीय भाषांतील साहित्य व कला यांचा परिचय एकमेकांना करून द्यायचा पत्कर या संस्थेनं घेतला आहे.

भारतातल्या बहुतेक सर्व राज्यांतल्या प्रमुख शहरांत 'आंतरभारती' संस्थेची केंद्रं स्थापलेली आहेत. श्रमशिबिरं, अभ्यासवर्ग, व्याख्यानं, भारतदर्शन-सहली इत्यादी साधनांनी संस्थेचं उद्दिष्ट साधण्याचा प्रयत्न होतो आहे.

## कन्नड संतकवी सर्वज्ञ

सर्वज्ञ हा कन्नड संतकवी १७ व्या शतकात होऊन गेला. आपल्या कवनांतून त्यानं लोकांना परखडपणे पण कळकळीनं उपदेश केला आहे. आपल्याकडच्या संत तुकारामबुवा यांच्याप्रमाणे सामान्य कन्नड लोकांपर्यंत सर्वज्ञाच्या उपदेशाचा प्रभाव पडलेला आढळतो. आपल्याकडे सामान्य लोकांच्या तोंडीही जशी तुकारामांची वचनं बसली आहेत, त्याचप्रमाणं कन्नड लोकांच्या तोंडी पावलोपावली सर्वज्ञाची वचनं येतात.

त्रिपदी नावाच्या छोट्याशा तशाच सुलभ छंदातून त्यानं काव्यरचना केली. लोकांचं कल्याण साधणारा त्याचा उपदेश सामान्य लोकांनाही सहज समजावा म्हणून. या दृष्टीनंही तुकारामबुवांच्या सुबोध अभंगरचनेशी त्याची तुलना करता येण्यासारखी आहे. तुकारामांची भाषाही परखड पण कळकळीची आहे. सर्वज्ञाच्या प्रभावी व सरस

काव्यरचनेमुळं त्रिपदी हा छंदप्रकार कन्नड लोकांत खूप लोकप्रिय झाला. आपल्याकडे जशी 'ओवी ज्ञानेशाची आणि अभंग तुकयाचा' असं गौरवानं म्हटलं जातं, तसंच कन्नड भाषेत 'त्रिपदी सर्वज्ञाची' असे गौरवाचे उद्‌गार निघाले आहेत.

आपल्या काव्यरचनेतून सर्वज्ञानं मूर्तिपूजा, जातिभेद, वंशाभिमान, ढोंगधत्तुरा, अशा अनेक अनिष्ट सामाजिक रुढी व आचरणांवर टीकेचे आसूड ओढलेले आहेत. अंतरंगशुद्धीवर त्याचा कटाक्ष होता. बाह्य अवडंबर खोटं आहे, फोल आहे, असं त्याचं ठाम म्हणणं. मनोमय भक्ती हीच खरी ईश्वरभक्ती असून तीर्थयात्रा, जपजाप्य, मूर्तिपूजा या गोष्टी म्हणजे बाह्य अवडंबर आहे, असं त्यानं रोखठोक म्हटलं आहे.

परमेश्वर माणसाच्या अंतरात्म्यात वास करीत असताना त्याची प्रतिमा कल्पिलेल्या मूर्तीला वंदन करणं व्यर्थ आहे, असं सांगून तो म्हणतो, की–'दगडाचं मंदिर बांधून त्यात दगडाची मूर्ती स्थापन करणारा माणूस म्हणजे स्वतःच दगड होय !'

ईश्वरी ज्ञानाची प्राप्ती करून घेण्याचा मार्ग त्यानं सुचवला आहे तो असा–

ध्यानरूपी नवी वात, मौनरूपी शुद्ध तूप व स्वानुभवरूपी ज्योत असलेल्या दीपानंच अज्ञानाचा अंधार नाहीसा होऊन ईश्वरी ज्ञान प्राप्त होईल.

सर्वज्ञ हे त्याचं खरं नाव नाही. पण खरं नाव माहीत झालेलं नाही. परमेश्वर 'सर्वज्ञ' आहे, त्याला अनुसरून यानं सर्वज्ञ या नावानं आपलं काव्य रचलेलं आहे.

कवनांतून लोकांना उपदेश करण्यापूर्वी सर्वज्ञानं देशभर फिरून तीर्थयात्रा केल्या. या आपल्या भटकंतीत त्यानं लोकजीवनाचं, समाजस्थितीचं खूप निरीक्षण केलं. या निरीक्षणापोटी झालेल्या

अभ्यासाअंतीच त्याचं विशिष्ट असं तत्त्वज्ञान बनलं.

सर्वज्ञाबद्दल चरित्रपर अशी माहिती मिळत नाही. त्याच्या लहानपणची थोडीशी माहिती सांगण्यात येते, ती अशी—

लहानपणी तो उनाडक्या करी, शिक्षणाकडे त्याचं लक्ष नसायचं. तो आपल्याच तंद्रीत असायचा. 'बाळ, तू कुणाचा ?' म्हणून एकदा त्यांच्या आईनं त्याला कौतुकानं विचारलं. तर हा आपल्याच तंद्रीत बोलला, 'मी— मी देवाचा आहे.'

*त्यावर संतापून आई उद्गारली, 'तर मग चालता हो इथून.'*

पोरसवदा सर्वज्ञाला घराबद्दल फारशी आपुलकी वाटत नव्हतीच. आईचे ते उद्गार ऐकून तो खरोखरच घर सोडून गेला.

त्यानंतर देशभर फिरून अनेक ठिकाणच्या लोकजीवनाचं त्यानं जवळून निरीक्षण केलं, आणि त्या अनुभवाच्या आधारानं उपदेशपर कवन केलं.

## गुरुकुल

गुरूच्या सान्निध्यात राहून विद्यार्थ्यांनी गुरूकडून शिक्षण घेण्याच्या पद्धतीस गुरुकुल शिक्षणपद्धती म्हणतात. गुरुकुल ही एकप्रकारची शिक्षणसंस्थाच असे. फार पूर्वीच्या काळी ही पद्धत रूढ होती. मुंज झाल्यावरच विद्यार्थ्याला गुरुकुलात घेतलं जाई. साधारणपणे बारा वर्षांचा एकूण शिक्षणक्रम असे. वेद, वेदांग व शास्त्र यांचं अध्ययन विद्यार्थ्यांना करावं लागे. प्रत्यक्ष अध्ययनाखेरीज विद्यार्थ्यांच्या मनावर सुसंस्कार करण्याकडेही लक्ष दिलं जाई. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थी गृहस्थाश्रम स्वीकारण्यास मोकळा होई.

गरीब वा श्रीमंत असा भेद विद्यार्थ्यांत करण्यात येत नसे. मात्र त्या काळी ब्राह्मण, वैश्य व क्षत्रिय या तीन वर्णांच्या विद्यार्थ्यांनाच अशा गुरुकुलात प्रवेश मिळे.

गुरुकुलाची शिक्षणपद्धत भारतात प्राचीन काळापासून चालत आली आहे. काही ऋषींचेसुद्धा विद्याश्रम असत. उदा. सांदिपनी ऋषींच्या आश्रमात श्रीकृष्ण, बलराम व सुदामा यांनी अध्ययन केलं होतं. पुढं या पद्धतीचा विकास होऊन तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, अशी विख्यात विद्यापीठे अस्तित्वात आली.

त्या काळी गुरुकुलांना राजाश्रय मिळे. गुरुकुलातील विद्यार्थ्यांचा चरितार्थ व शिक्षणखर्च करणं हे त्या काळचे राजे आपलं कर्तव्यच मानीत.

## शिखांचा धर्मग्रंथ : 'गुरुग्रंथ'

'गुरुग्रंथ' हा शिखांचा धर्मग्रंथ असून तो गुरुमुखी लिपीत लिहिलेला आहे. या ग्रंथाचे एकूण ७ अध्याय आहेत.

सर्वशक्तिमान असलेलं ब्रह्म हेच अखेरचं सत्य आहे, कारण ते कालातीत आहे, असं ते मानतात. ब्रह्म हे ज्ञानानं अवगत करून घेता येत नाही. वाणीही त्यापुढे थिटी पडते. अनुभवानंच ब्रह्माचा साक्षात्कार होतो. ब्रह्म, सृष्टी, जीवात्मा, साध्य, इत्यादी विषयांचं विवरण या ग्रंथात केलेलं आहे.

'ब्रह्म' या शब्दाबद्दल 'वाहि गुरू' असा शब्दप्रयोग शीख लोक करतात.


## गुरुदक्षिणा

पूर्वीच्या काळी ऋषींच्या आश्रमात राहून निवडक विद्यार्थी शिक्षण घेत. असे हे शिष्य अध्ययन पूर्ण झाल्यावर, घरी परत जाण्यापूर्वी गुरूला यथाशक्ती दक्षिणा देत. ती गुरुदक्षिणा.

प्रत्येक धर्मपंथांचेही ठराविक गुरू असतात. त्यांनाही त्यांचे शिष्य प्रसंगपरत्वे दक्षिणा देतात. जन्म, दीक्षा, लग्न, उत्सव, मृत्यू, अशा विविध प्रसंगी गुरूंना शिष्य दक्षिणा देत असत.

## गुरुद्वारा

'गुरुद्वारा' म्हणजे शिखांचं उपासनामंदिर. उपासनामंदिरात प्रभूची उपासना केल्यानं प्रभूकडे जाण्याचा मार्ग मोकळा होतो, म्हणून शीख लोक उपासना-मंदिराला प्रभूचं दार मानून तिथं प्रार्थना करतात. पंजाबी भाषेत 'द्वारा' हा शब्द 'द्वार' बद्दल रूढ आहे. पूर्वी याला धर्मसाल म्हणत. पण पुढं तो शब्द



अबचलनगर सचखंड गुरुद्वारा – नांदेड

वापरातून गेला व त्याची जागा ‘गुरुद्वारा’नं घेतली.

गुरुद्वाऱ्यात फक्त गुरुग्रंथ ठेवलेला असतो. कुणाही देवाची मूर्ती अशी नसते. गुरुद्वाऱ्यात पहाटे काही नित्यपाठ होत असतात, ते म्हणजे– जपजीसाहेब, सुखमनिसाहेब, आसादीवारचं कीर्तनं, जापसाहेब, आनंदसाहेब. नित्यपाठानंतर अर्जुनदेवाच्या ‘सुखमनी’मधील प्रार्थना होते. मग दहा गुरू, पाच पुत्र, पंच प्यारे इत्यादींचं स्मरण केलं जातं. शेवटी प्रसाद वाटतात.

गुरुद्वाऱ्यात प्रवेश करताना डोकं उघडंबोडकं असता कामा नये, असा दंडक आहे. किमान रुमालानं तरी माथं झाकायला हवं असतं.

भारतात शिखांची चार धर्मपीठं आहेत, ती अशी– (१) पूर्वेस गुरुगोविंदसिंगाचं जन्मस्थान असलेलं पाटणा, (२) पश्चिमेस अमृतसरचं श्रीअकाल तख्त, (३) उत्तरेला आनंदपूर, व (४) दक्षिणेला नांदेड. अर्थात या चारही ठिकाणी गुरुद्वारा आहेत.

## गुरुपौर्णिमा

आषाढ पौर्णिमेला गुरुपौर्णिमा मानतात. व्यासमहर्षी हे सर्वश्रेष्ठ गुरू म्हणून या दिवशी त्यांची पूजा पूर्वापार करण्यात येते. आद्य शंकराचार्यांच्या रूपानं महर्षी व्यासांनी अवतार घेतला, असं भाविक मानतात, म्हणून या दिवशी संन्यासी मंडळी शंकराचार्यांना व्यास मानून त्यांची पूजा करतात. गुरूकडून दीक्षा घेणारे ज्या-त्या गुरूचे शिष्यही आपापल्या दीक्षागुरूंची पूजा करतात.

व्यासपूजा ज्येष्ठ पौर्णिमेला करण्याची प्रथा तमीळनाडूत आहे. शंकराचार्यांची दक्षिण भारतातली दोन पीठं म्हणजे कुंभकोणम् व शृंगेरी.

या ठिकाणी व्यासपूजा विशेष उत्सवानं केली जाते.

## गुरुमुखी लिपी

गुरुमुखी म्हणजे पंजाबी लिपी. पूर्वी लंडा नावाची लिपी पंजाबी लोकांत चालायची. पण त्या लिपीत स्वरचिन्हं नसल्यानं, त्या लिपीतले धर्मग्रंथ शुद्ध स्वरूपात वाचणं अशक्य होई. ही उणीव गुरू अंगदानं दूर केली. शुद्ध स्वरूपात धर्मग्रंथांचं लेखन व्हावं, या दृष्टीनं त्यानं नागरी लिपीप्रमाणं स्वरचिन्हं असलेली लिपी तयार केली. यासाठी त्यानं भोवतालच्या प्रदेशांतील लिप्यांतून थोड्याफार फेरफारासह काही वर्ण घेतले आहेत. अर्जुनदेव या पाचव्या शीख धर्मगुरूनं या नवीन लिपीत आदिग्रंथाचं लेखन केलं. साहजिकच ही लिपी शिखांची धार्मिक लिपी बनली. गुरूच्या मुखातून ही लिपी बाहेर पडली, म्हणून ती 'गुरुमुखी' या नावानं प्रसिद्धीला आली.

## गोकुळ

गोकुळ हे गाव सध्याच्या उत्तर प्रदेशातल्या मथुरा जिल्ह्यात आहे. श्रीकृष्ण मथुरेतल्या कंसराजाच्या तुरुंगात जन्मला. (कारण त्याची आई देवकी, तिचा नवरा वसुदेव याच्यासह तुरुंगवास भोगीत होती.) पण जन्मल्यानंतर लगेच वसुदेवानं त्याला गुपचूप गोकुळात नेऊन ठेवलं व त्याचे प्राण वाचवले. या गोकुळात कृष्णाचं बालपण गेलं, त्याच्या

बालक्रीडा झाल्या. म्हणून गोकुळ हे गाव खूप गाजलं. गोकुळ हे गवळ्यांचं-गोपांचं गाव. त्या गावचा प्रमुख नंद व त्याची पत्नी यशोदा यांनीच बाळकृष्णाचं पालनपोषण केलं. कंसानं कृष्णाचा वध करण्यासाठी धाडलेल्या पुतनामावशीचाच उलटा वध कृष्णानं इथंच केला.

विष्णूचे भक्त ते वैष्णव. तर या वैष्णव पंथांची मंडळी, विष्णूचा अवतार मानलेल्या कृष्णाच्या लीलांची भूमी म्हणून गोकुळ हे पवित्र क्षेत्र मानतात. गोकुळाची एकाहून-एक सरस वर्णनं अनेक संतांनी केलेली आहेत.

श्रीकृष्णाच्या भक्तांचा जो वल्लभसंप्रदाय म्हणून आहे, तो गोकुळ हे आपलं मोठं केंद्र मानतो. या संप्रदायाच्या सध्या इथं चोवीसेक जुन्या हवेल्या आहेत. सध्या गोकुळात प्रेक्षणीय स्थळं आहेत, ती अशी— वल्लभाचार्यांची बैठक, गोकुळनाथाची बैठक, वल्लभघाट, गोविंदघाट, गोकुळनाथाचं मंदिर, व्रजराजाचं मंदिर.

ब्रह्मांडतीर्थ व रमणरेती ही इथली पवित्र तीर्थं मानलेली आहेत.

## चामुंडराय व बाहुबलीची भव्य मूर्ती

इसवी सनाच्या १० व्या शतकात चामुंडराय हा कर्तबगार महापुरुष होऊन गेला. गंगवंशातील राजा रायमल्ल याचा हा मंत्री व सेनापती होता. त्याचं मूळ नाव गोम्मट असून रायमल्ल राजानं त्याला 'राय' ही पदवी देऊन त्याचा गौरव केला होता.

आधी वैदिक ब्राह्मण असलेला चामुंडराय मागाहून जैन बनला. आपल्या आईला तो भारी मानायचा. तिच्याच इच्छेनुसार त्यानं

श्रवणबेळगोळ इथं बाहुबली गोमटेश्वर याची, अखंड पाषाणातील प्रचंड मूर्ती उभारली. यावरून या ठिकाणाला गोम्मटतीर्थ असंही म्हणतात.

गोमटेश्वराची ही मूर्ती ४७० फूट उंचीच्या टेकडीवर उघड्या आकाशाखाली उभारलेली असून ती ५७ फूट उंच आहे. पाचशे पायऱ्या चढून टेकडीवर पोचता येतं. मूर्तीचा फक्त मांड्यांपर्यंतचा भाग पाठीमागच्या खडकाला चिकटलेला आहे. वरच्या बाकीच्या सर्व भागाला कसलाही आधार नाही. पाषाणकमळावर उभी असलेली ही मूर्ती पांढरीशुभ्र व नितळ आहे, मूर्तीच्या चेहऱ्यावर मंदस्मित खुलत असतं.

मूर्ती अतिशय भव्य. त्यामुळे तिची रीतसर पूजा रोज करणं जमण्यासारखं नाही. म्हणून तिच्या पावलांचीच तेवढी पूजा रोज प्रतीकात्मक अशी करण्यात येते. तशी ती पावलंही भलीमोठी आहेत म्हणा. प्रत्येक पाऊल तब्बल सव्वाआठ फूट लांब आहे. दूध, तूप, मधानं मस्तकाभिषेक वगैरे करून मूर्तीची यथासांग पूजा दर पंधरा वर्षांनी केली जाते. धनवान जैनभक्त त्या वेळी मूर्तीवर सोन्या-रुप्याची फुलं व नाणी उधळतात. या उत्सवाला भाविकांची अलोट गर्दी होते.

चामुंडरायानं ही मूर्ती इ. सनाच्या दहाव्या शतकाअखेरीला उभारली असून मूर्तीच्या पायांपाशी नागरी लिपीत दोन मराठी वाक्यं कोरून लिहिलेली आढळतात, ती अशी— 'श्रीचामुंडरायें करवियले ।' 'गंगराजे सुत्तालें करवियलें ।'

मराठी भाषेतला हा सर्वात जुना शिलालेख मानला जातो.

संस्कृत, प्राकृत व कन्नड भाषांचा पंडित असलेल्या चामुंडरायानं ग्रंथसाधनाही केलेली आहे. इ. स. ९७८ साली त्यानं 'त्रिषष्टीलक्षण' महापुराण रचलं असून त्याला 'चामुंडपुराण' असंही म्हणतात. याशिवाय त्यानं 'गोम्मटसंग्रहसूत्र' हा दुसरा ग्रंथ रचला आहे.

# संत चोखामेळा (चोखोबा)

संत चोखामेळा हा नामदेवाचा शिष्य. जातीनं महार असूनही त्यानं सुंदर मराठी भाषेत व उदात्त अशी अभंगरचना केलेली आहे. चोखोबा म्हणूनही तो ओळखला जातो. त्याची बायको सोयराबाई व मुलगा कर्ममेळा, तर बहीण निर्मला नावाची होती. ही सर्वजण विठ्ठलभक्त असून त्यांनी कमी-अधिक अभंगरचना केलेली आहे.

चोखोबाची संत म्हणून योग्यता मोठी होती. म्हणूनच ज्ञानदेव-नामदेवांच्या संतमंडळात त्याला मानाचं स्थान होतं.

कष्टमय संसारी जीवनानं जेरीस आला असता चोखोबानं, मनाच्या शांततेसाठी तीर्थयात्रा केली. पण त्याचा मनस्ताप काही कमी झाला नाही. अखेर पंढरपूरलाच त्याच्या मनाची तलखली दूर झाली. त्याबद्दल त्यानं एका अभंगातच म्हटलं आहे—

*बहुत हिंडलो देशदेशांतरा ।*
*परंतु मन नाही स्थिर झाले कोठे ॥*
*चोखा म्हणे पाहता पंढरी भूवैकुंठ ।*
*मनाचे हे कष्ट दूर झाले ॥*

महार असूनही चोखोबा स्वच्छतेनं व टापटीपीनं राहायचा. तो मांस खात नसे. नेहमीचा कामधंदा उरकला म्हणजे तो आंघोळ करायचा व धुतलेलं वस्त्र लेवून विठोबाचं भजन-पूजन करायचा.

पंढरपूरजवळच्या मंगळवेढे इथं गावकूसाच्या कामासाठी जवळपासचे अनेक महार वेठीनं कामाला जुंपले होते. चोखोबालाही त्या कामात भाग घ्यावा लागला. तर चालू असलेलं ते बांधकाम एकाएकी कोसळून, त्या पडझडीत चोखोबा गाडला गेला व मरण पावला. त्या दिवशी वैशाख वद्य पंचमी होती.

चोखोबाच्या अस्थी शोधून आणण्याबद्दल नामदेवाला पांडुरंगाचा दृष्टान्त झाला. तशा नामदेवानं त्या अस्थी शोधून आणल्या व त्या विठ्ठलमंदिराच्या महाद्वाराशी पुरल्या. मग तिथं समाधी बांधली. तेव्हापासून पांडुरंगाचं दर्शन घेण्याआधी चोखोबाच्या समाधीचं दर्शन यात्रेकरूनं घ्यावं, असा परिपाठ पडला आहे.

चोखोबानं आपल्या अभंगांतून देहाला पंढरीची उपमा दिली असून आत्मा म्हणजे अविनाशी पांडुरंग आहे, असं म्हटलं आहे.

## चौदा रत्नं

प्राचीन काळी मानलेली चौदा रत्नं अशी होती—

लक्ष्मी (विष्णूची पत्नी), कौस्तुभ (विष्णूच्या कंठातील भूषण), पारिजातक (इंद्राच्या बागेतील पुष्पवृक्ष), सुरा (दैत्यांना आवडणारं मादक पेय), धन्वंतरी (देवादिकांचा वैद्य), चंद्रमा, कामधेनू, गज (इंद्राचा ऐरावत), रंभा (अप्सरा), अश्व (सूर्याचा सात तोंडांचा घोडा), विष (शंकरानं प्राशन केलेलं हलाहल), धनुष्य (विष्णूनं धारण केलेलं), शंख (विष्णूच्या हातातला), व अमृत (देवादिकांचं आवडतं पेय). क्षीरसागराचं मंथन देवांनी व दैत्यांनी मिळून केलं, त्यातून ही रत्नं वर आली, असं मानण्यात येतं.

## चौदा विद्या

प्राचीन काळी गणल्या गेलेल्या चौदा विद्या अशा होत्या—

(१) ब्रह्मज्ञान, (२) रसायन, (३) स्वरधर, (४) वेद, (५) ज्योतिष, (६)

व्याकरण, (७) धनुर्विद्या, (८) जलतरण, (९) न्याय, (१०) कोक, (११) अश्वारोहण, (१२) नाट्य, (१३) कृषी, व (१४) वैद्यक.

दुसरं एक मत असं आहे की चार वेद, चार उपवेद व सहा शास्त्रे मिळून चौदा विद्या होत. तर, चार वेद, सहा वेदांगे, मीमांसा, तर्क, धर्मशास्त्र व पुराणे मिळून चौदा विद्या होत, असं तिसरं एक मत आहे.

## जातककथा

भगवान बुद्धाच्या विविध पूर्वजन्मांच्या कथा म्हणून पालीभाषेत लिहून ठेवलेल्या आहेत, त्यांना जातककथा (जन्मासंबंधीच्या कथा) म्हणतात.

सिद्धार्थ गौतमाला तपश्चर्येनंतर दिव्य ज्ञानाचा बोध झाला. त्याला बुद्धत्व लाभलं. तर, त्यापूर्वीचा जो साधक बुद्ध त्याला बोधिसत्त्व मानण्यात आलं असून बोधिसत्त्वांच्या विविध जन्मांत बुद्ध दान, शील, मैत्री, इ. दहा परिमितांचा अभ्यास करतो. सदाचरणानं वागणारा बुद्ध, परोपकारी बुद्ध, भूतदया दाखविण्यापायी प्रसंगी आत्मबलिदान करणारा बुद्ध— म्हणजेच वेगवेगळ्या जन्मांतल्या बोधिसत्त्वांच्या या कथा. या विविध जन्मांतील सदाचरणाचं फल म्हणजे त्याला प्राप्त झालेलं बुद्धत्व होय, असं मानलेलं आहे.

बोधिसत्त्व म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी झटणारा प्राणी. या अवस्थेतल्या बुद्धाच्या अनेक जन्मांतल्या कथा म्हणून जातककथा अवतरल्या आहेत. 'वाराणसीत ब्रह्मदत्त राजा राज्य करीत असताना बोधिसत्त्व कुरंग मृगाच्या योनीत जन्माला आला,' '(कुरंगमिगजातक) अशी बहुधा प्रत्येक जातकथेची सुरुवात केलेली असते. वेगवेगळ्या कथेत कधी

माणूस म्हणून, कधी अमुक एक पशू म्हणून, तर कधी एखादा पक्षी म्हणून बोधिसत्त्व जन्माला आलेला एकेका जातककथेत दाखवलेला आहे. त्या त्या जन्मात बोधिसत्त्वानं कसकसं सत्कार्य केलं हे एकेका कथेत वर्णून सांगितलेलं आहे.

भारत व बौद्धधर्माचा जिथं प्रसार झाला ते शेजारचे देश इथल्या परंपरेला अनुसरून पाहिलं असता एकूण ५५० जातककथा असाव्यात. परंतु सध्या उपलब्ध असलेल्या जातककथांची संख्या दोन-तीन आकड्यांनी कमी भरते.

लोकसाहित्याशी साम्य असलेल्या या जातककथांची विभागणी अशा सात भागांत करता येते : (१) व्यावहारिक नीतिसंबंधी कथा, (२) पशुपक्षीकथा, (३) विनोदी कथा, (४) रोमांचकारी दीर्घकथा, (५) नीतिवर्णनपर कथा, (६) कथन, व (७) धार्मिक कथा.

माणसं एकंदरीत पशुपक्ष्यांपेक्षा क्षुद्र वृत्तीनं वागतात, असं काही जातककथांतून दाखवून दिलेलं आहे. गरहितजातकातील अशा एका कथेचा नमुना पहा—

एकदा एक वानर काही दिवस एका राजवाड्यात राहून आला. तेव्हा सगळी वानरमंडळी त्याच्याभोवती जमली. माणसं कशी काय वागतात ?-म्हणून त्याला विचारू लागली. "ते काही सांगण्यासारखं नाही. मला त्याबद्दल विचारू नका." असं म्हणून तो वानर सांगायचं टाळू लागला. पण जोडीदार वानरांनी खूपच आग्रह धरला. तेव्हा तो म्हणाला— "ही माणसं 'माझं सोनं, माझं सोनं,' असा सदासर्वकाळ त्यांचा जप चाललेला असतो. त्यांच्या घरातली स्त्री धन देऊन खरेदी केलेली असते. तीही इतर माणसांना सतावते." एवढं ऐकून होताच, आपले कान झाकून घेऊन ते जोडीदार वानर त्याला म्हणाले, "पुरे बाबा तुझं माणूसवर्णन. आणखी काहीसुद्धा सांगू नकोस."

काही जातककथा मनोरंजक असून त्यांतील महाजनक जातक, बावेरू जातक व सुप्पारकजातक ही लक्षणीय आहेत. चंपानगरीतून सुवर्णभूमीकडे निघालेल्या सार्थवाहांची कथा महाजनक जातकात असून, सीरिया व बाबिलोन या देशांबरोबरचे भारताचे व्यापारी संबंध बावेरू जातकात दाखवले आहेत. तर सुप्पारक जातकात भरुवच्छापासून इराणापर्यंतच्या समुद्रयात्रेचं वर्णन केलेलं आहे. आणि अप्पण्णक व वण्णुपथ या जातकांत अरण्य व वाळ्वंट यांतून प्रवास करणाऱ्या व्यापाऱ्यांना वाटेत कसकसे हाल सहन करावे लागले ते सांगितलं आहे.

रामायण, महाभारत, भागवत इत्यादी संस्कृत महाकाव्यं व ग्रंथ यांच्यांतून घेतलेल्या काही कथा जातककथांत आहेत. पण त्यांचं स्वरूप बहुशः मूळ कथांहून विपरीत, विकृत केलेलं आढळतं.

तसं जातकवाङ्मयच बुद्धापूर्वीच्या लोककथांच्या स्वरूपात आढळतं.

काही जुन्या बौद्धशिल्पांवर काही जातककथा चित्रित केलेल्या दिसतात. अजंठा, वेरूळ इथल्या लेण्यांत तर अनेक जातककथा चितारलेल्या दिसतात.

बौद्ध धर्माचा प्रचार आशिया खंडात करताना प्रचारक भिक्षूंना जातककथांनी हातभार लावला. या कथांचे लोण इराण-अरबस्थानांवाटे युरोपापर्यंत पोचले. अनेक युरोपीयन भाषांत जातककथांची भाषांतरं झाली असून सिंदबादच्या सफरी व अरेबियन नाइट्स्चं उगमस्थान जातककथा आहेत, असं एका इटालियन विद्वानानं म्हटलं आहे. उत्तरेला तिबेट-मंगोलिया व श्रीलंका आणि आग्नेय व पूर्व आशियातले ब्रह्मदेश, सयाम, चीन व जपान आदी देशांतही जातककथांचा प्रसार झालेला आहे.

जातककाळात स्त्रियांना शिक्षण दिले जाई. काही जातककथांत विद्वान स्त्रियांचाही उल्लेख असून विद्वान बुद्धशिष्य सारिपुत्त याला

शास्त्राचा अर्थ लावण्याचं आव्हान चार बुद्धिवान स्त्रियांनी दिल्याचा उल्लेख चुल्लकालिंग जातकात आहे.

वाटमारी करून प्रवाशांना लुटणाऱ्या डाकूंचं वर्णनही काही जातककथांतून आलेलं आहे. पाचशे डाकूंचं एक गाव असल्याचा उल्लेख एका कथेत असून हे डाकू एखाद्या गावावरही दरोडा घालीत व स्त्रियांनाही पळवून नेत, असं म्हटलं आहे.

एकूण जातककथांत विषयांची विविधता खूपच आहे. जातककाळातल्या समाजजीवनाच्या वेगवेगळ्या अंगांचं प्रतिबिंब जातककथांत पडलेलं आढळतं.

## सिंहासनबत्तिशी

'सिंहासनबत्तिशी' हा बत्तीस कथापुष्पांची मालिका असलेला लोकप्रिय संस्कृत ग्रंथ आहे. या ग्रंथाचं कथासार असं आहे—

विक्रमादित्य नावाचा शूर तसाच उदार वृत्तीचा थोर राजा होता. इंद्रानं त्याला बत्तीस पुतळ्यांचं विलक्षण सिंहासन बहाल केलं. विक्रमादित्यानं आपल्या राजवटीत ते वापरलं अन् शेवटी ते जमिनीत पुरून टाकलं.

त्यानंतर काही काळानं भोजराजाची राजवट सुरू झाली. तेव्हा योगायोगानं जमीन खणली असता बत्तीस पुतळ्यांचं ते सिंहासन सापडलं. ते आगळंवेगळं सिंहासन भोजराजाला आवडलं. यापुढं तेच आपण वापरायचं, असं ठरवून त्यानं ते दरबारात आणून ठेवलं. पण त्यावर तो प्रथम बसायला गेला, तेव्हा त्या सिंहासनाच्या एका पुतळीनं जिवंत होऊन त्याला अडवलं आणि त्या सिंहासनाचा पूर्वीचा मालक विक्रमादित्य याचा थोरपणा दाखवून देणारी एक कथा सांगितली. ती

कथा सांगून झाल्यावर ती भोजराजाला म्हणाली—

"भोजराजा, विक्रमादित्यासारखं असं कर्तृत्व तुझ्या अंगी असेल, तरच त्याच्या या सिंहासनावर बसण्याचा हक्क तुला पोचतो."

तसा भोजराजा मागं सरला. दुसऱ्या वेळी भोजराजा पुन्हा सिंहासनावर बसायला पुढं सरसावला, तेव्हा दुसऱ्या पुतळीनं त्याला विक्रमादित्याची दुसरी कथा सांगितली. आणि ती त्याला निक्षून म्हणाली—

"भोजराजा, विक्रमादित्यासारखी अशी त्यागी वृत्ती तुझ्या अंगात असेल, तरच त्याच्या या सिंहासनावर बसण्याचा हक्क तुला पोचतो."

अशा प्रकारे विक्रमादित्याचं शौर्य, धैर्य, उदारपणा, प्रसंगी देहत्याग करण्याची तयारी, वगैरे त्याचे एकेक गुण दर्शवणारी एकेक कथा एकेका पुतळीनं भोजराजाला ऐकवली. विक्रमादित्याचा थोरपणा प्रकट करणाऱ्या अशा बत्तीस कथा त्या बत्तीस पुतळ्यांनी भोजराजाला सांगितल्या आणि 'विक्रमादित्याचा हा गुण तुझ्या अंगी असेल, तरच त्याच्या या सिंहासनावर तुला बसता येईल !' असं भोजराजाला बजावलं.

त्या कथा ऐकून, त्या सिंहासनावर जाऊन बसण्याचं धाडस भोजराजाला झालं नाही. तसं ते सिंहासन हां हां म्हणता आकाशात उडून गेलं.

'कथासरित्सागर' या ग्रंथातल्या अनेक कथा 'सिंहासनबत्तीशी'त आढळतात. मात्र सिंहासनबत्तीशी चा लेखक कोण, याची निश्चित अशी माहिती मिळत नाही. मूळ संस्कृत ग्रंथाची भाषा सुबोध असून त्याचे अनुवाद मराठी, हिंदी आदी भारतीय भाषांत झालेले आहेत.

२६९६ दिनांक २३।८।८२
७१।दी

## मानससरोवर

मानससरोवर हे तीर्थक्षेत्र असून ते हिमालयातील तिबेटच्या पठारानजीक आहे. नजीक म्हणजे तसं तीसेक मैल अंतरावर. हे सरोवर नेहमी हिमाच्छादित असतं. असं असूनही याच्या पोटात उकळत्या पाण्याचे झरे आहेत. या झऱ्यांतून जी वाफ वर उफाळते तिच्या जोरकस दाबामुळे हिवाळ्यात सरोवराच्या पृष्ठभागावरच्या बर्फाच्या थरात भेगा पडतात व त्या बर्फाचे मोठमोठे तुकडे वर काठावर फेकले जातात.

या सरोवरात उकळत्या पाण्याचे झरे असल्यामुळे याचं पाणी, पृष्ठभागावर बर्फाचा थर असूनही, फार गार असत नाही. साहजिकच वरचा हिमथर बाजूला करून खालच्या पाण्यात स्नान करणं कठीण जात नाही.

मानससरोवराकडे जाण्याच्या पायवाटा बऱ्याच खडतर आहेत. पण त्यांतल्या त्यात अलमोड्याहून जाणारी वाट थोडीफार सोयीची आहे. ही वाट दोनेकशे मैल लांबीची आहे. पायी चालणं अवघड झाल्यास बसण्यासाठी घोडे, व सामान वाहण्यासाठी खेचरं भाड्यानं मिळतात. हा सर्व भाग बहुतेक सारा उजाड आहे. लहानखुरी काटेरी झुडपं तेवढी उगवतात. कुठंही राहण्याची सोय नाही. लहानसा तंबू बरोबर नेला, तर तो उभारून त्यात तात्पुरतं राहता येतं. वाटेत वाटमारी होऊ नये म्हणून आपल्याबरोबर एखादा रक्षक घेणं इष्ट. अलमोड्याहून मानससरोवराकडे जाण्याच्या वाटेवर जे पहिलं मुक्कामाचं ठिकाण— गर्बिआंग मिळतं, तिथंच घोडं, खेचर व रक्षक मिळू शकतात.

मानससरोवरानजीक एक पर्वत असून त्यापलीकडे राक्षसताल नावाचं दुसरं विशाल सरोवर आहे. सरोवरांचे हे दोन डोळे, नाकाडासारख्या मधल्या पर्वतामुळे अलग पडले आहेत. लंकेचा राजा

रावण यानं, शिवाला प्रसन्न करून घेण्यासाठी या सरोवरापाशी तप केलं, म्हणून या सरोवराला राक्षसताल नाव पडलं, अशी याबद्दल दंतकथा आहे. मानससरोवराचा आकार साधारणपणे लंबवर्तुळाकार आहे, तर राक्षसताल हे सरोवर वेडंवाकडं, आडवंतिडवं लांबचलांब पसरलं आहे. मैलोन्-मैल लांब पसरलेल्या याच्या शाखा वाकड्यातिकड्या वळणांनी पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांत शिरतात.

समुद्रसपाटीपासून १५ हजार फूट उंचीवर असलेल्या मानससरोवराचा परीघ अजमासे ५४ मैलांचा आहे. खोली साडेतीनशे फूट असून पाणी निळंशंख असतं. मानससरोवरात मासे असतात, तसेच तिथं हंस व राजहंसही असतात. राजहंस पांढरेशुभ्र असतात, तर साधे हंस राखाडी रंगाचे किंवा बदामी रंगाचे असतात. आश्चर्याची गोष्ट अशी की, या सरोवरात कमळं मुळीच आढळत नाहीत.

## नवरत्नं

नवरत्नं मानली आहेत ती अशी—

(१) हिरा, (२) माणिक, (३) मोती, (४) इंद्रनील, (५) पाच, (६) प्रवाळ (पोवळं), (७) गोमेद, (८) पुष्कराज, (९) वैडूर्य.

## नवरस

शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र व शांत असे नऊ रस साहित्यशास्त्रात नमूद केले असून कुणी कुणी भक्तिरस हा दहावा रस मानतात.

## नवनाथ

मत्स्येंद्र, गोरक्ष, जालंधर, कानीफ, चर्पटी, नाग, भरथरी (भर्तृहरी), रेवण, व गहिनी हे नवनाथ मानलेले आहेत.

## विवेकसिंधू

'विवेकसिंधू' हा मराठीतील आद्यग्रंथ मानतात. बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेला मुकुंदराज हा या ग्रंथाचा कर्ता. हा ग्रंथ 'ज्ञानेश्वरी'- पूर्वी लिहिला गेला म्हणून हा आद्य मराठी ग्रंथ होय, असं मानलं जातं. पण कुणीकुणी विद्वान मुकुंदराज हे ज्ञानेश्वरांनंतरचे असं मत व्यक्त करतात.

विवेकसिंधू ग्रंथ पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन भागांत विभागलेला आहे. विश्वाच्या उभारणीबद्दल पहिल्या भागात लिहिलेलं असून विश्वाच्या संहाराबद्दलचा भाग उत्तरार्धात दिलेला आहे. जीवात्मा व परमात्मा यांचं अद्वैत सिद्ध केलेलं आहे. या विषयाला धरूनच सत्-चित्-आनंद याबद्दल प्रवचन असून शेवटी गुरुमाहात्म्य वर्णिलं आहे.

मुख्य विषयाच्या प्रतिपादनाबरोबरच त्या अनुरोधानं सुचलेले इतर काही विषयही या ग्रंथात चर्चिलेले आहेत. मराठी भाषेची थोरवी, ग्रंथाचा उद्देश, त्याचं फळ, गुरुशिष्य लक्षणं, इ.

परमेश्वराच्या स्वरूपाचा अनुभव आपल्याला आला असल्याचं नमूद करून मुकुंदराजांनी पुढं म्हटलं आहे की, तरीसुद्धा परमेश्वराचं

चिंतन करीत न बसता परोपकारी दृष्टीनं आपण हा ग्रंथ रचला आहे.

## नवरोज (पारश्यांचा पाडवा)

नवरोज म्हणून पारशी लोकांचा पाडवा (नववर्षदिन) ओळखला जातो. सूर्य मेष राशीत ज्या दिवशी जातो तोच त्यांचा नववर्षाचा प्रारंभदिन होय. पूर्वीच्या काळी इराणमध्ये हा सण साजरा करीत. अकबर बादशहानं नवरोज सण साजरा करण्याची प्रथा दिल्लीत सुरू केली होती, मोगलांची कारकीर्द असेपर्यंत ती चालली. पाच दिवस साजऱ्या होणाऱ्या या सणात मीनाबाजार भरत असे. नवीन नाणी पाडली जात.

पाडव्याच्या या दिवशी नवीन धान्यं, फळंफुलं, भाजीपाला, वेगवेगळे खाद्यपदार्थ, गुलाबपाणी, आरसा, अशा गोष्टींची सजावट करतात. भेटीला आलेल्या माणसांचं स्वागत पारशी लोक त्यांच्यावर गुलाबपाणी शिंपडून करतात. त्यांच्यापुढे आरसा धरतात. आरसा पाहून माणसाला साहजिकच हसू फुटतं. तर पुढील वर्षभर त्यानं असंच हसतमुख राहावं, अशी शुभेच्छा व्यक्त करणं ही आरसा दाखवण्यामागची कल्पना. या दिवशी एकमेकांच्या घरी जाऊन पारशी लोक आनंद व्यक्त करतात.

## नांदी

जुन्या जमान्यात सूत्रधार नाटकाची नांदी म्हणून नाटकाची सुरुवात करायचा, इष्टदेवतेचं नमन करणारा किंवा तिची प्रार्थना करणारा श्लोक

तो म्हणायचा. नाट्यशास्त्रकार भरतमुनी यांनी आपल्या त्या ग्रंथात नांदी या पूजाविधीचं वर्णन पूर्वरंग म्हणून केलेलं आहे. सूत्रधार आपल्या सहाय्यकांसह हा पूजाविधी उरकायचा.

मुख्यतः नटराज शिव याच्या स्तवनासाठी नाटककार मंगल श्लोक रचीत असे व सूत्रधार त्या नाटकाच्या प्रारंभी तो श्लोक साकी वा दिंडी वृत्तात गात असे. यालाच नांदी म्हणत. संस्कृत नाटकांतून ही प्रथा रूढ झाली होती. जुन्या मराठी (तशाच इतर देशी भाषी नाटकांतून) कटाक्षानं नांदी म्हटली जाई. मराठीत अण्णासाहेब किर्लोस्करांपासून पुढं देवल, खाडिलकर, गडकरी यांच्यापर्यंतच्या जुन्या नाटककारांनी बहुधा शिवस्तुतीवर नांदी रचलेली आढळते. त्यानंतर मात्र नांदीची प्रथा हळूहळू बंद पडली.

'नांदी म्हणणं' म्हणजे एखाद्या गोष्टीची सुरुवात करणं, असा वाक्प्रचारही रूढ झाला आहे.

## नाच गो घुमा

काही मुली मिळून 'नाच गो घुमा' हा एक प्रकारचा सामुदायिक नाच करतात. दागिने, चांगले कपडे, वेणी वगैरे आपल्याला नाही, म्हणून एक मुलगी खिन्न बसून राहिली आहे, अशी कल्पना करून तिनं आपला खेद घालवावा, म्हणून इतर मुली गाण्यातून तिची समजूत घालू पाहतात.

या नृत्यासाठी काही मुली वर्तुळ बनवून उभ्या राहतात. तर एक मुलगी हातात सूप घेऊन त्या वर्तुळाच्या मध्यभागी उभी राहते. भोवतालच्या मुली, एकमेकींच्या हातात हात गुंफून गाण्याच्या तालावर वर्तुळाकार नाचत, त्या मुलीला नाचायचा आग्रह करतात. 'नाच गो घुमा'

हे त्या मुलींच्या गाण्याचं पालुपद असतं. तेव्हा ती मुलगी, आपल्याकडे दागिने, कपडे, फुलांची वेणी वगैरे साज नाही, तर मग 'नाचू मी कशी ?' असं रडगाणं गाते. ही कुरकूर (गाण्यातून) करीत असताना ती आपल्या हातातलं सूप खाली-वर करीत असते. भोवतालच्या मुली 'नाच गो घुमा' असं तालावर म्हणत सभोवार नाचत असतात, तर मधली मुलगी, गाण्यातूनच सबबींचा पाढा वाचत राहते. मुख्यतः मंगळागौरीच्या रात्रीच्या फुगड्या-नाचांच्या कार्यक्रमात वगैरे हे नाच-गाणं होतं. या गाण्याचं एक कडवं असं आहे—

*'नाच गो घुमा ।'*
*'नाचू मी कशी ?—*
*या गावचा । त्या गावचा । सोनार नाही आला ।*
*दागिना नाही मला । नाचू मी कशी ?'*

## भरतवाक्य

भरतवाक्य म्हणजे नाटकाच्या शेवटी येणारं वाक्य. संस्कृत नाटकांत नाटकाच्या शेवटी नटांच्या तोंडून कोणतेतरी आशीर्वादपर वचन वदवलं जात असे, त्याला 'भरतवाक्य' म्हणतात. विख्यात संस्कृत नाटककार भास यांच्यापासून पुढं जी जी संस्कृत नाटकं लिहिली गेली, त्यांच्या कर्त्यांनी आपापलं नाटक भरतवाक्यानंच पूर्ण केलेलं आहे.

काही जुन्या मराठी नाटकांच्या शेवटीही नाटकातील सर्व पात्रं, एका रांगेत उभी राहून कोणतेतरी भरतवाक्य म्हणत असत. नाटकांना आधुनिक वळण लागलं, तेव्हा हा प्रघात बंद पडला.

राजेलोक किंवा प्रजाजन यांच्याबद्दल भरतवाक्यात शुभेच्छा व्यक्त

केलेली असे. परमेश्वराला— नटराज शंकराला प्रार्थना करून सर्वांचं शुभचिंतन केलेलं असे.

महाकवी कालिदास यानं 'शाकुंतल' या आपल्या संस्कृत नाटकाच्या शेवटी जे भरतवाक्य घातलं आहे, त्याचा अर्थ असा आहे—

राजा प्रजेच्या हितासाठी झटत राहो ! शास्त्राचा अभ्यास करणारे विद्वान आणि कवी यांच्यावर सरस्वतीची कृपा होवो ! सर्वसामर्थ्यशाली शंकर माझ्या पुनर्जन्मांचा क्षय करो !

अशा प्रकारच्या शुभचिंतनाला किंवा आशीर्वचनाला 'भरतवाक्य' का म्हणण्यात येतं हे मात्र निश्चित असं कळत नाही. भरत म्हणजे नट. त्या नटांनी, नाटकाच्या मूळ विषयाबाहेरचं उद्‌गारलेलं वाक्य म्हणून याला 'भरतवाक्य' असं नाव पडलंय, की आद्य नाट्यशास्त्राकार भरतमुनी यांच्या गौरवासाठी त्यांचं नाव अशा वाक्याला दिलं गेलं आहे ?

मात्र नाटकातील या भरतवाक्यावरून कोणत्याही गोष्टीचा शेवट झाला म्हणजे 'भरतवाक्य म्हटलं गेलं' असा वाक्प्रचार मराठीत तरी रूढ झाला आहे.

## ब्रह्मगिरी

---

गोदावरी नदी ज्या डोंगरातून उगम पावते तो ब्रह्मगिरी म्हणून ओळखला जातो. गोदावरीच्या उगमस्थानाचं लहानसं कुंड तिथं आहे. नासिकपासून अठरा मैलांवर असलेला हा डोंगर पवित्र मानला जातो. कारण याच्या पायथ्याशी त्र्यंबकेश्वर हे ज्योतिर्लिंग आहे. या डोंगरावर प्राचीन काळी गौतम ऋषींचा आश्रम होता.

गोरखगुंफा नावाची एक गुहा या डोंगराच्या कुशीत असून

गोदावरीच्या उगमापासून या गुंफेकडे जाणारी एक पाऊलवाटही आहे.

संत ज्ञानेश्वरांचा थोरला भाऊ व गुरू निवृत्तिनाथ यांचे गुरू गहिनीनाथ याच गुहेत निवृत्तिनाथांना प्रथम भेटले, असं म्हणतात.

ब्रह्मगिरी समुद्रसपाटीपासून सव्वाचार हजार फूट उंच असून पाचेकशे पायऱ्या चढून वर जाता येते. पंजाबमधल्या दोन धनिकांनी १९०८ साली या पायऱ्या बांधल्या व डोंगराची चढण सोपी केली.

## भेंड्यांचा खेळ

---

मुलांचा आवडता खेळ. याला 'भंड्यांचा खेळ' असंही म्हणतात. भारतातल्या इतर प्रदेशांत हा खेळ रूढ असला, तरी महाराष्ट्रात हा खेळ मुलं तशीच काही वेळा थोरली माणसंही हौसेनं खेळतात. कविता, गाणी, नावं, आडनावं, फळाफुलांची नावं, गावांची नावं अशा प्रकारे नाना तऱ्हांनी हा खेळ खेळतात. परस्परविरोधी असे दोन गट बनवतात, आणि एका गटातल्या कुणीही पदाच्या किंवा कोणत्याही नावाच्या शेवटच्या अक्षरानं सुरुवात होणारं पद किंवा नाव उच्चारायचं असतं. ज्या गटातल्या कुणालाही विरुद्ध गटानं सादर केलेल्या सूत्राचं टोक धरून पुढं मजल मारता येत नाही, त्या गटावर 'भेंडी चढली' असं मानण्यात येतं. गट नसले तर दोन मुलांतसुद्धा हा खेळ होऊ शकतो.

या खेळामुळे मुलांच्या पाठांतरात, व्यवहारज्ञानात वा सामान्यज्ञानात वाढ होते. हा खेळ मजेत वेळ घालवणारा, उद्‌बोधक तसाच मनोरंजक असल्यामुळेच दोनेक हजार वर्षांपूर्वीपासून चालत आलेला आहे, असं आढळतं. प्राचीन संस्कृत ग्रंथांत या खेळाच्या इतिहासाचा धागा सापडतो. इ. सनाच्या १२ व्या शतकात पुरुषोत्तम देव या ग्रंथकारानं

आपल्या 'हारावली' नावाच्या कोशात या खेळाला 'प्रतिमाला' असं नाव दिलेलं आढळतं. याबद्दल खुलासा करणारा एक श्लोक त्यानं दिला आहे, त्याचा अर्थ असा—

'पूर्वीच्या श्लोकातलं शेवटचं अक्षर घेऊन दुसरा श्लोक म्हणणं व असे क्रमाक्रमानं एकामागून एक श्लोक म्हणणं, या प्रकाराला प्रतिमाला म्हणतात.'

विरोधक गट किंवा मुलगा याच्या पदाचं किंवा नावाचं अंत्याक्षर ण, ळ, सारखं अशक्य कोटीतलं येतं, तेव्हा अशा अपवादभूत विचित्र अक्षराऐवजी दुसरं रीतसर अक्षर द्यायला त्या गटाला किंवा मुलाला सांगण्यात येतं. तसं मग तो दुसरं नवीन अक्षर देतो. पण त्या अक्षरानं सुरू होणारं पद वा नाव सुचलं नाही, तर मात्र त्या गटावर वा मुलावर भेंडी चढते.

## भस्त्रा (चामड्याची नौका)

फार पूर्वीच्या काळी चामड्याची नाव बनवीत, तिला म्हणत भस्त्रा. शेळ्या-मेंढ्यांचं किंवा त्यांच्याहून मोठाल्या पशूंचं चामडं हवा भरून फुगवीत व अशी फुगवलेली चामडी एकमेकांवर बांधून त्यांची नाव बनवीत. पंजाब, वायव्य भारत, अफगाणिस्तान अशा प्रदेशांत नद्या पार करण्यासाठी अशाच नौकांचा वापर सोयीस्कर ठरे. प्राचीन व्याकरणकार पाणिनी यानं अशा नावेला 'भस्त्रा' व ती वापरून नदीपार जाणाऱ्याला 'भस्त्रिक' अशी नावं दिलेली आहेत.

अजूनसुद्धा पंजाबात वगैरे दोन बैलांच्या फुगवलेल्या चामड्यांवर लाकडी खाट ठेवतात व तीवर बसून लोक नदी पार करतात. नदी पार

केल्यावर त्या लोकांतला बळकट माणूस ती चामडी दुमडून, त्यांच्या घड्या करून खांद्यावर टाकून घेऊन जाऊ शकतो. पश्चिम भारत, इराण, अफगाणिस्तान, तिबेट या भागांत माणसांची व मालाची जलवाहतूक करण्यासाठी अशा नौकांचा वापर प्राचीन काळी करीत असत.

## भास्कराचार्य

भास्कराचार्य हा एक महान भारतीय ज्योतिषशास्त्रज्ञ होऊन गेला. इ.स. ११४४ ते १२२३ हा त्याचा काळ. भास्कराचार्यांच्या चरित्राबद्दलची फारशी माहिती उपलब्ध नाही. सह्याद्रीजवळचं बिज्जलवीड हे त्याचं गाव. मराठवाड्यातलं सध्याचं बीड हे ते गाव असावं, असा तर्क आहे.

भास्कराचार्यांनी लिहिलेल्या अनेक ग्रंथांपैकी 'सिद्धान्तशिरोमणी' हा विशेष मोठा असून 'लीलावती' हा वाखाणला गेलेला गणितविद्याविषयक भाग या ग्रंथाचाच एक खंड होय.

भास्कराचार्यांची लीलावती नावाची मुलगी होती. लग्नानंतर ती विधवा होऊन माहेरी परतली. तिचा वेळ सत्कारणी जावा, म्हणून त्यांनी तिला गणितशास्त्र शिकवलं.

गणितविद्येसारखा किचकट विषय त्यांनी या ग्रंथात सहजपणे म्हणजे लीलया समजावून सांगितलेला आहे, म्हणून त्याचं नाव त्यांनी 'लीलावती' असं ठेवलं. लीलावती, बीजगणित, ग्रहगणित व गोल असे 'सिद्धान्तशिरोमणी'चे चार खंड आहेत. वैज्ञानिक क्षेत्रात या ग्रंथाचा मोठा नावलौकिक आहे. भास्कराचार्यांनंतर तब्बल पाचेकशे वर्षं भारतीय शिक्षणक्रमात गणितावरील पाठ्यग्रंथ म्हणून या ग्रंथाचा उपयोग होत राहिला, यावरून या ग्रंथाचं श्रेष्ठत्व लक्षात येईल.

'लीलावती'ची हस्तलिखितं काश्मीरपासून तो कन्याकुमारीपर्यंत अशी सगळ्या भारतभर पाहायला मिळतात. या एकट्या खंडावर पंधरा-वीस टीका झालेल्या असून आजच्या दृष्टीनं सारं अंकगणित व बीजगणित यांचा त्यात मुख्यतः समावेश आहे. अबुल फैजी या फारसी पंडितानं १५८३ साली 'लीलावती'चं फारसी भाषांतर केलं.

'बीजगणित' या दुसऱ्या खंडात धनर्ण संख्यांची बेरीज, अव्यक्तांची बेरीज, करणी संख्यांची बेरीज, एकवर्ण समीकरण, अनेकवर्ण समीकरण, इ. विषयांचा समावेश आहे. या खंडावरही अनेक टीका झालेल्या असून शहाजहान बादशहाच्या कारकीर्दीत अताउल्ला रसीदी यानं १६३४ साली याचं फारसी भाषांतर केलेलं दिसून येतं.

या विषयातलं भास्कराचार्यांचं प्रावीण्य पाहून अनेक पाश्चात्त्य पंडित थक्क झाले आहेत. गणिताध्याय व गोलाध्याय हे खंड ज्योतीषशास्त्राबद्दलचे आहेत. गणिताध्यायात ग्रहगणित व पंचांगनिर्मितीचं गणित आहे, तर गोलाध्यायात ग्रहगणिताध्यायातील सर्व विषयांची उपपत्ती, यंत्राध्याय, गोलीय त्रिकोणमिती, इ. विषय आलेले आहेत. एकूण 'सिद्धान्तशिरोमणी' या ग्रंथावरून भारतीय ज्योतिषशास्त्रासंबंधी सांगोपांग माहिती कळते. त्या काळी गणिताच्या चारही शाखांतली उदाहरणं या ग्रंथाच्या अध्ययनानं विद्यार्थी सुकरपणे सोडवू शकत.

सोप्या रीती व सोयीस्कर पद्धतीमुळे भास्कराचार्यांच्या ग्रंथांचा भारतभर प्रसार झाला. क्षेत्रफळ काढण्याची रीतही त्यांना अवगत होती. आधीच्या काही ग्रंथकारांची चुकीची अनुमानं त्यांनी खोडून काढली आहेत.

पृथ्वी वाटोळी असून ती अधांतरी आपल्याभोवती फिरत असते, हे भास्कराचार्यादी ज्योतिर्विदांना ठाऊक होतं. या शोधांची माहिती

'सूर्यसिद्धान्त' या ग्रंथात दिलेली आहे. दुर्बीण वगैरे सूक्ष्मदर्शक यंत्रसाधनं त्या काळात उपलब्ध नसूनसुद्धा हे शोध त्यांनी लावले. यावरून त्यांच्या तीव्र बुद्धिमत्तेची झेप कळून येते. पृथ्वीचं अक्षभ्रमण व कक्षाभ्रमण यांची कल्पनाही भास्कराचार्यांना होती. शास्त्रज्ञ न्यूटन यांचा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त आठेक शतकांपूर्वी भास्कराचार्यांनी मांडलेला आढळतो. संस्कृतातील त्यांच्या प्रतिपादनाचा अर्थ असा आहे—

'पृथ्वीच्या ठिकाणी आकर्षणशक्ती असून त्या शक्तीच्या आधारे आकाशातील जड वस्तू ती आपल्याकडे खेचून घेते. ती वस्तू पडत असल्याचा केवळ भास होतो. आकाश सर्व बाजूंनी समान असल्यानं ती दुसरीकडे कुठं जाणार ?'

पृथ्वी गोल असल्याचं शाबीत करताना भास्कराचार्यांनी मुद्दे मांडले आहेत ते असे—

'पृथ्वी जर सपाट असती, तर दूर गेलेला सूर्यही माणसाला सतत दिसला असता. तसं घडत नसल्यानं पृथ्वी गोलाकार असल्याचं सिद्ध होतं. माणसाच्या दृष्टीला पृथ्वीचा फार थोडा भाग दिसू शकतो. वर्तुळपरिघाचा शंभरावा भागसुद्धा सपाट असतो. तसाच पृथ्वीचा नजरेला पडणारा भाग सपाट भासतो.'

पृथ्वीभोवतालच्या वातावरणाबद्दल भास्कराचार्यांनी म्हटलं आहे की, पृथ्वीच्या पृष्ठभागापासून १२ योजनं (म्हणजे ९६ मैल) अंतरापर्यंत भूवायू (वातावरण) आहे. याच वातावरणात मेघांचे, विजेचे वगैरे चमत्कार घडून येतात.

हर्षल, नॉर्मन, लार्डनर इत्यादी अर्वाचीन पाश्चात्त्य ज्योतिषशास्त्रज्ञ पृथ्वीच्या वातावरणाची उंची साधारणपणे ८० मैल मानतात. म्हणजे, अलीकडच्या सूक्ष्मदर्शक यंत्रांच्या आधारे अवगत झालेल्या ज्ञानाशी

भास्कराचार्यांचं ज्ञान बऱ्याच अंशी मिळतंजुळतं, ही अर्थातच लक्षणीय बाब.

कोपर्निकस, टाकोब्राही, न्यूटन या आधुनिक शास्त्रज्ञांचे महत्त्वाचे सिद्धान्त तर भास्कराचार्यांनी पूर्वीच्या काळीच मांडलेले आहेत. राहू, केतू या राक्षसांपायी सूर्य-चंद्राची ग्रहणं उद्‌भवतात, ही समजूत चुकीची असून पृथ्वीच्या छायेत चंद्रबिंब गेल्यानं ग्रहण लागतं, असं प्रतिपादन त्यांनी केलं आहे. चंद्राला स्वतःचा प्रकाश नाही, हेही भास्कराचार्य जाणून होते.

## भीमगोड तीर्थस्थान

हरिद्वारहून ऋषीकेशला जाताना हिमालयाच्या कुशीत भीमगोड नावाचं तीर्थस्थान लागतं. हरिद्वारलगतच्या पर्वतराजीत एक मंदिर असून तिथंच एक कुंड आहे. या कुंडालाच भीमगोड तीर्थ म्हणतात. याबद्दलची एक आख्यायिका अशी आहे, की— भीमानं या ठिकाणी आपला गुडघा टेकून तप केलं म्हणून हे स्थान भीमगोड म्हणून ओळखलं जातं. दुसरी आख्यायिका असं सांगते, की— भागीरथीचा (गंगेचा) प्रवाह भलतीकडे वळत होता, तर भीमानं आपल्या बाहुबलानं तो प्रवाह अडवून त्याला नीट, हवंतसं वळण दिलं. त्यावरून या कुंडाला तसं नाव पडलं.

इथून जवळच चोवीस अवतारांच्या मूर्तींचं मंदिर लागतं. त्या मंदिरालगत सप्तस्रोत हे तीर्थ आहे. गंगेचा प्रवाह इथं सात धारांत विभागला गेला, म्हणूनच हे स्थान सप्तस्रोत म्हणून ओळखलं जातं, असं म्हणतात. तर दुसरी एक दंतकथा असं सांगते की, सप्तर्षी इथं वस्तीला होते, आणि त्यांची सोय करावी म्हणून गंगेनं आपला प्रवाह इथं सात धारांत विखुरला.

## भीमताल तीर्थस्थान

उत्तर प्रदेशातील नैनितालपासून ११-१२ मैलांवर हिमालयात भीमताल नावाचं मोठालं सरोवर आहे. हे प्राचीन तीर्थस्थान असून डोंगराच्या पठारावर आहे. या सरोवरात मध्यभागी एक लहानशी टेकडी आहे. शिवाय या सरोवराच्या आसपास लहान-मोठी अशी तब्बल साठ सरोवरं आहेत. भीमताल सरोवराच्या काठावर एक शिवमंदिर असून भीमेश्वर म्हणून ते ओळखलं जातं. त्यालगतच एक मोठं वारूळ आहे. पुराणकथांतून उल्लेखिल्या गेलेल्या कर्कोटक या नागाचं हे वारूळ आहे, अशी समजूत रूढ आहे. कर्कोटक नावाचं एक शिखरही या ठिकाणी आहे.

## भूपाळी

विनम्र भावानं ईश्वराला आळवण्यासाठी, त्याला जागं करण्यासाठी पहाटेला भूप रागात गीत म्हटलं जातं, त्याला भूपाळी म्हणतात. ईश्वराचे रूपगुण आळवीत त्याचं स्तवन या भूपाळीतून केलेलं असतं. त्याचप्रमाणे, प्रभात झाल्याची जाणीव करून देऊन उठून जगाच्या उद्धारासाठी सज्ज होण्याचं आवाहनही ईश्वराला केलं जातं. नमुन्यादाखल एका भूपाळीची सुरुवात पाहा—

*घनःश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला ।*
*उठि लवकरी वनमाळी, उदयाचली मित्र आला ॥*

जुन्या मराठी गीतभांडारात भूपाळीचं स्थान विशेष गौरवाचं गणलं गेलं आहे.

## भूर्जपत्र

भूर्ज नावाच्या वृक्षाची साल म्हणजे भूर्जपत्र. प्राचीन काळी कागदासारखं लेखनाचं साधन उपलब्ध नव्हतं. म्हणून, टिकावू ठरलेल्या या सालीवर पूर्वीच्या काळी लेखन केलं जाई. हे भूर्जवृक्ष हिमालयात आढळतात.

ही साल आधी उन्हात वाळवीत. मग पाण्यात उकळून पुन्हा वाळवीत. त्यानंतर तिच्यावर शंख वा कवड्या घोटून ती गुळगुळीत करीत. मग सोयीनुसार हव्या त्या आकाराचे तुकडे करून त्यांवर ठराविक बनावटीच्या शाईनं लेखन करीत.

कितीतरी प्राचीन ग्रंथ अशा भूर्जपत्रांवर लिहिलेले आढळतात. दुसऱ्या शतकात नकललेला 'धम्मपद' हा ग्रंथ भूर्जपत्रांवर लिहिलेला असून तो अजून उपलब्ध आहे. तो खरौष्ठी लिपीत आहे.

पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळातही अनेक भूर्जपत्रं आहेत. सप्तशती ग्रंथ त्यांवरच लिहिलेला आढळतो. १ फूट लांब व १ फूट रुंद अशा चौरस आकाराची ही भूर्जपत्रं आहेत. भारतातल्या काही संग्रहालयांत भूर्जपत्रांवर लिहिलेले ग्रंथ बघायला मिळतात.

## निसर्गसुंदर भेडाघाट

जबलपूरपासून तेराएक मैलांवर नर्मदेच्या काठी भेडाघाट म्हणून एक निसर्गसुंदर स्थान आहे. इथं नर्मदा नदी ३० फूट उंचीवरून खडकावरून कोसळत असल्यानं तो एक धबधबाच बनला आहे. धुवांधार म्हणून

ओळखल्या जाणाऱ्या या धबधब्याखाली नदीचा प्रवाह वाहतो तो अरुंद होऊन. शुभ्र संगमरवरी पाषाणाच्या शंभरेक फूट उंचीच्या दोन दरडींमधून. या पाषाणांतून निळ्या, पिवळ्या व गुलाबी रंगछटा चमकताना दिसतात. या दरडीत एके ठिकाणी नदीचं पात्र इतकं अरुंद बनलं आहे की, माकड उडी मारून ते पात्र सहज ओलांडू शकतं. म्हणून या ठिकाणाला बंदरकुदनी म्हणतात. निसर्गसुंदर दृश्यामुळे हे प्रेक्षणीय स्थळ बनलं आहे.

नदीच्या पात्रात शिवलिंग आहे, तर लगतच्या खडकात एक गुहा आहे. इथं भृगू ऋषीनं तपश्चर्या केली, म्हणून हे भृगुतीर्थ मानलं जातं.

## भोजपूर

बिहार राज्यातल्या शाहाबाद जिल्ह्यात भोजपूर हे गाव आहे. पूर्वीच्या काळी या गावाजवळून गंगा नदी वाहायची. त्या काळी या गावानं तीसेक मैल क्षेत्र व्यापलं होतं. गाव भरभराटलेलंही होतं. पण नंतर त्या नदीचं पात्र आठ-नऊ मैल दूर सरकलेलं आहे.

माळव्याच्या भोज राजावरून हे भोजपूर नगर पूर्वी वसलं. त्या काळी भोजराजानं उभारलेल्या या नगरीतील अनेक प्रेक्षणीय स्थळांचे अवशेष अजून तिथले वृद्ध लोक आवर्जून दाखवतात. या स्थळांत भोजानं बांधलेलं मंदिर, महाल, नाट्यगृह, सरोवर, विक्रमादित्य महाराजांचा महाल, 'सिंहासनबत्तीशी' या ग्रंथात उल्लेखिलेलं सिंहासन पुरलेली जागा, विक्रमादित्याच्या नवरत्नांचं सभागृह यांचा प्रामुख्यानं समावेश होतो.

भोपाळजवळ कालियासोत नदीच्या काठावर दुसरं एक भोजपूर

गाव आहे. तिथं टेकडीवरच्या शिवमंदिराचं प्रवेशद्वार तब्बल ५० फूट उंच व १५ फूट रुंद आहे. या द्वाराच्या दोन्ही बाजूंना द्वारपालासारख्या, चवरी धरलेल्या दोन कोरीव स्त्री-आकृती आहेत. या मंदिराचं मुख्य वैशिष्ट्य म्हणजे हे तळघरात बांधल्यासारखं आहे. खाली गाभाऱ्यात उतरून गेल्यावर भल्या मोठ्या चबुतऱ्यावर साडेसात फूट उंचीचं भव्य तसंच चमकदार शिवलिंग आढळतं. हे मंदिर अकराव्या शतकात भोजराजानं बांधलं असावं, असा तर्क आहे.

## मंगलाष्टक

विवाहविधीत वधूवरांना आशीर्वाद देणारे असे आठ श्लोक भटजी, दोघांमधे अंतरपाट धरून म्हणतात, त्यांना म्हणतात मंगलाष्टक. त्याआधी वराची मधुपर्कपूजा होऊन त्याला तांदळाच्या पुंजीवर, पूर्वेकडे तोंड करून उभा करतात. त्याच्यासमोर पश्चिमेकडे तोंड केलेली वधू उभी करतात. दोघांमधे अंतरपाट धरून दोन भटजी दोन अंगांना उभे राहून हे मंगलाष्टक म्हणतात. त्यातल्या प्रत्येक श्लोकाच्या शेवटी 'कुर्यात सदा मंगलम्', 'शुभमंगल सावधान !' असं पालुपद म्हटलं जातं. या शब्दांच्या उच्चाराबरोबरच ते दोघे भटजी व विवाहसमारंभाला जमलेली मंडळी वधूवरांच्या माथ्यांवर अक्षता टाकतात.

हे श्लोक असतात शार्दूलविक्रीडित वृत्तात. ईशस्तुतीपर असलेला या वृत्तातला कोणताही श्लोक मंगलाष्टकात चालतो.

मौंजीबंधनातही पिता व बटू यांच्यामधे अंतरपाट धरून मंगलाष्टकं म्हणतात. मात्र या श्लोकांच्या अखेरीस 'कुर्यात् बटोर्मंगलम्' असे शब्द उच्चारले जातात.

## वृंदावन

मथुरा व तिच्या आसपासचा भाग यांना व्रजमंडल म्हणतात. या व्रजमंडळात वृंदावन, हे श्रीकृष्णाच्या जीवनाशी संबंधित असल्यानं पुण्यक्षेत्र मानलेलं आहे. मथुरा नगरीच्या ६ मैल उत्तरेला हे स्थळ आहे. पूर्वीच्या काळी कधीतरी इथं तुलसीची वनराई होती, म्हणून या स्थळाला 'वृंदावन' हे नाव पडलं म्हणतात.

श्रीकृष्णाची लीलास्थानं म्हणून अनेक स्थानं इथं दाखवतात. त्यांच्यात कालियाडोह, वंशीवट, केसीघाट, राधाबावडी ही स्थळं प्रमुख आहेत.

वृंदावनात मंदिरं तर असंख्य आहेत. हिंदी भक्तकवींनी वृंदावन या क्षेत्रावर असंख्य कवनं केलेली आहेत.

सर्व वैष्णव संप्रदायांची केंद्रं वृंदावनात आहेत.

## हेमाडपंती देवालयं

देवालयांच्या बांधणीचे अनेक प्रकार भारतात आढळतात. भारतातील देवालयं भव्य तशीच विशाल व देखणी बनवण्याच्या कामी भारतीय शिल्पी व कारागीर यांनी जणू आपलं कसब पणाला लावलेलं दिसतं.

उत्तर भारतात देवालयांच्या बांधणीचे काही प्रकार आढळतात, तर विंध्य पर्वताच्या दक्षिणेस जो वेगळा प्रकार आढळतो, त्याला 'हेमाडपंती देवालयं' असं म्हणतात. एरव्हीच्या बांधकामात दगड किंवा विटा

एकमेकांना घट्ट चिकटून राहाव्यात, म्हणून चिकणमाती, चुना वा सिमेंट असं काहीतरी वापरतात. पण हेमाडपंती पद्धतीच्या बांधकामाचा प्रकार काही वेगळाच आहे. त्रिकोण, चौकोन, काटकोन, वर्तुळ, अर्धवर्तुळ अशा आकारात चिरे घडवतात. आणि ते कुशलतेनं एकमेकांत असे काही बेमालूम घट्ट बसवतात की, इमारतींच्या विविध अंगांना एकमेकांचा आधार लाभून वरचं छतसुद्धा बिनधोक सावरलं जातं. या प्रकारची मंदिरं तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात व चौदाव्या शतकात बांधली गेल्याचं आढळून येतं.

देवगिरीचा महादेवराय या राजाकडे हेमाद्री किंवा हेमाडपंत हा 'श्रीकरणाधिप' म्हणून होता. या बांधकामपद्धतीचा पुरस्कार हेमांडपंतानं केला, म्हणून या बांधकाम प्रकाराला हेमाडपंती असं नाव रूढ झालं.

हेमाडपंती देवालयाच्या सभामंडपाला अनेक खांब असून तो सुशोभित केलेला असतो. खांबांवर व छतावर पौराणिक प्रसंग कोरीव चित्रांतून रेखाटलेले आढळतात. सभामंडपाला काही वेळा कमानींचा आधार दिलेला असतो. बहुतेक सर्व बांधकाम काळ्या पाषाणात केलं जातं. या देवालयांवर प्राचीन शिलालेख अनेक ठिकाणी आढळतात. बहुधा एखाद्या जलाशयाच्या शेजारी ही देवालयं बांधलेली आढळतात.

## धर्मचक्रप्रवर्तन

बोधिवृक्षाखाली गौतमाला दिव्यज्ञान प्राप्त होऊन तो बुद्ध झाला. त्यानंतर तो बौद्ध धर्माचा प्रसार करायला निघाला. वाराणसीनजीक सारनाथ या ठिकाणी मृगद्राव म्हणून वन होतं. तिथं त्यानं पहिलं धर्मप्रवचन केलं. याच गोष्टीला बौद्ध साहित्यात 'धर्मचक्रप्रवर्तन' असं

म्हटलेलं आहे.



धर्मचक्रप्रवर्तन मुद्रेत भगवान बुद्ध – वेरूळ

बौद्ध धर्माचा ज्यानं अतोनात प्रसार केला, त्या सम्राट अशोकानं सारनाथ इथं या धर्मचक्राचं प्रतीक बनवून ठेवलं आहे. तिथं त्यानं जो अशोकस्तंभ उभारला आहे, त्याच्या माथ्यावर कोरलेल्या चार सिंहाकृतींच्या खांद्यांवर ते आधारलेलं होतं. भग्न झालेल्या अवस्थेत ते उत्खननात सापडलं आहे. त्या चक्राचे ३२ आरे ३२ महापुरुषलक्षणांचे प्रतिनिधी आहेत, असं मानतात. हे चक्र आध्यात्मिक शक्तीचं वर्चस्व दर्शवणारं आहे

## धवलगिरी

ओरिसा राज्यात भुवनेश्वर शहराजवळ दोनेक मैलांवर धवलगिरी नावाचा पर्वत आहे. इथल्या भागात अश्वत्थाम्याचं एक स्थान असल्यानं या पर्वताला अश्वत्थामा पर्वत असंही म्हटलं जातं.

या पर्वताच्या पायथ्याजवळच सम्राट अशोकाचं कलिंग राजाशी तुंबळ युद्ध झालं. या युद्धात एवढा प्रचंड मनुष्यसंहार झाला की, सम्राट

अशोकाचं मन युद्धाला उबगलं. आणि इथंच त्यानं बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.

या पर्वतावर बरेच बौद्ध विहार आहेत.

## धाराशिव लेणी

मराठवाड्यात धाराशिव (सध्याचं उस्मानाबाद) या गावालगत प्राचीन लेणी आहेत. धाराशिवपासून तीनेक मैलांवर काही शैव लेणी आहेत, त्यांना चांभारलेणी म्हणतात. तर बाराएक मैलांवरच्या डोंगरात सात जैन लेणी आहेत. ही लेणी नीट अवस्थेत सध्या नाहीत. तरीसुद्धा त्यांची काही जुनी वैशिष्ट्यं अजूनही टिकून आहेत.

या लेण्यांतलं दुसरं लेणं मोठं व लक्षवेधक आहे. यात ३२ स्तंभांवर आधारलेला भव्य मंडप असून मोठाल्या गाभाऱ्यात पार्श्वनाथ तीर्थंकरांची भव्य मूर्ती आहे.

## नगारा

नगारा हे चर्मवाद्य असून त्याची धातूची दोन भांडी असतात. ही भांडी कढईच्या आकाराची पण पसरट नसून उभट असतात. या दोन भांड्यांपैकी मोठ्याला नर म्हणतात, तर लहानाला जील. ही भांडी तांबं, पितळ किंवा लोखंड या धातूंची बनवतात. धातूच्या पत्र्याच्या भांड्याच्या वरच्या रुंदट तोंडावर चामडं ताणून गच्च बसवतात. दोन ते तीन

फुटांपासून पाचेक फुटांपर्यंतच्या व्यासाचे नगारे बनवतात. नगारा वाजवणाऱ्याला नगारची असं म्हणतात. काहीशा बाकदार पण चिवट अशा सडपातळ काठ्यांनी, नगाऱ्याच्या चामड्यावर ठराविक ठेका धरून नगारा वाजवतात.

सध्या देवळांतल्या वगैरे धार्मिक उत्सवांत, कौटुंबिक मंगलप्रसंगी नगारा वाजवतात. काही खेडेगावांत ग्रामदेवतेच्या देवळात नगाऱ्यासाठी खास नगारखाना असतो. तिथं पहाटे काकडआरतीच्या वेळी आणि संध्याकाळी दिवेलागणीला, धुपारतीच्या वेळी थोडा वेळ नगारा वाजवण्याची प्रथा कुठंकुठं अजून आढळून येते. याला नौबत म्हणतात.

पूर्वीच्या काळी युद्धाच्या सुरुवातीला वगैरे नगारे (हे अर्थातच भलेमोठे असत.) वाजवीत. त्यांना दुंदुभी म्हणत. लढाईच्या वेळी लढवय्या वीरांना स्फुरण चढावं, यासाठी मुख्यतः नगारा हे रणवाद्य वाजवीत.

आफ्रिकेच्या जंगलात राहणाऱ्या रानटी टोळ्या, दूरवर असलेल्या आपल्या संबंधित माणसांना संदेश देण्यासाठी विशिष्ट पद्धतीनं नगारे वाजवतात.

## संत नरसी मेहता

पंधराव्या शतकात (१४१५-१४८१ इ.स.) नरसी मेहता हा गुजराती संतकवी होऊन गेला. बाळपणीच आई-बाप मरण पावल्यानं हा पोरका झाला. म्हणून त्याच्या चुलत भावानं त्याला आपल्याकडे आणून वाढवले. लहानपणी काही काम न करता हा उनाडक्या करी. भजन-कीर्तन मात्र त्याला आवडे. त्यात रंगला की, दुसऱ्या कशाचीही

त्याला आठवण राहत नसे. असाच एकदा तो भजनात रमल्यानं घरी उशिरा गेला. त्यावरून संतापून त्याच्या भावजयीनं त्याला घरातून हाकलून लावलं.

घरातून बाहेर पडलेला नरसी भटकत-भटकत एका रानात गेला. तिथं एक शिवमंदिर होतं. त्यात त्यानं शंकराची आराधना केली. पुढं मग त्याला दृष्टान्त होऊन तो कृष्णभक्त बनला. त्याला कवनं रचण्याची प्रेरणा मिळाली.



नरसी मेहता

त्याचा शोध लागताच चुलतभावानं त्याला पुन्हा घरी आणलं. तो संसारात रमावा म्हणून त्यानं नरसीचं लग्न करून दिलं. त्यानं थोडे दिवस संसार केला. त्याला दोन मुलंही झाली. पण त्याचा हरिभक्तीचा ध्यास काही सुटेना. पुढं त्याचा मुलगा वारला. त्यानंतर लौकरच त्याची पत्नीही मरण पावली. तेव्हा तर, संसाराचे पाश सुटल्यानं तो हरिभजनात जास्तच रमून गेला.

गुजराती भाषेत भक्तियुग त्यानं सुरू केलं असं मानतात. 'श्यामलदासनी विवाह', 'हार', 'हुंडी', 'मामेरू', 'राससहस्रपदी', 'शृंगारमाला', अशी अनेक काव्यं त्यानं रचली. 'गुजराती भाषेतील वाल्मीकी' म्हणून त्याचा गौरव झाला. गुजराती भाषेत आख्यानकाव्य

हा प्रकार त्यानंच आणला.

नरसी गुजरातेतच नव्हे, तर राजस्थानातही लोकप्रिय झाला. राजस्थानात शिमग्यात डफाच्या तालावर गीतं गातात, त्यांत नरसीची स्तुती असते. 'डुंडी' हे त्याचं काव्य स्त्रीसमाजात विशेष लोकप्रिय आहे.

नरसीचं चरित्र कथन करणारं 'माहेरा' नावाचं दीर्घकाव्य रतन नावाच्या कुणा लोककवीनं रचलेलं आढळतं.

जुनागढमधे 'नरसीचा चोरा' नावाचं ठिकाण आहे. तिथल्या श्रीकृष्णमंदिरात नरसीच्या पूजेतली मूर्ती स्थापण्यात आली आहे. मार्गशीर्ष महिन्यातल्या शुद्ध सप्तमीला तिथं यात्रा भरते.

## हिंदी भक्तकवी नरहरी

अकबर बादशहाच्या काळात नरहरी नावाचा प्रसिद्ध हिंदी भक्तकवी होऊन गेला. १५०५ साली ब्राह्मणकुळात जन्मलेला नरहरी आयुष्याची शंभरी गाठल्यानंतर पाच वर्षांनी मरण पावला.

लहानपणीच फारसी भाषा शिकलेल्या नरहरीला अकबर बादशहाच्या दरबारात राजकवी हा मान लाभला होता. 'महाकवी' व 'महामात्र' असे किताब अकबरानं त्याला दिले होते.

अकबर व नरहरी यांचं एकमेकांवर गाढ प्रेम होतं. या दोघांविषयीची एक आख्यायिका सांगतात, ती अशी—

एकदा एक गाय कसायाच्या हातून निसटली. ती धावत नरहरीच्या घरात शिरली. तो कसाईही तिचा पाठलाग करीत तिथं आला. त्याला बाहेरच थोपवून नरहरीनं 'छप्पय' या प्रकारचं कवन रचलं. कवनाचा तो कागद त्या गाईच्या गळ्यात बांधला अन् त्या गाईसह तो अकबराकडे

गेला. कसाईही निरुपायानं त्यांच्याबरोबर निघाला.

आपण लोकांना दूध वगैरे देऊन उपयोगी पडत असताना आपणाला का मारण्यात येतं? अशा अर्थाचं गाईचं गाऱ्हाणं अकबरापुढं त्या छप्पयातून मांडण्यात आलं होतं. ते कवन वाचून अकबर एवढा खूष झाला की, त्यानं त्या गाईला कसायाच्या तावडीतून तर मोकळं केलंच. शिवाय राज्यात यापुढं गोवध होता कामा नये, असं फर्मान काढलं.

नरहरी अकबराच्या मर्जीतला असल्यानं वेळीप्रसंगी अकबराची चूक आढळून आली, तर ती सुधारण्यासाठी तो अकबराला कवनातून उपदेश करी. 'रुक्मिणीमंगल,' 'छप्पय नीती' व 'कवितासंग्रह' हे तीन प्रमुख ग्रंथ नरहरीच्या नावावर असून त्याखेरीज १२३ छंद, ६० छप्पय, ४० सवैये, १२ दोहे, ५ कुंडलिया, ४ कवित्त व २ सोरठे त्यानं रचलेले आहेत. सीतास्वयंवर, बरहमासा अशी फुटकळ कवनंही त्यानं रचलेली आढळतात. 'छप्पयनीती'मधल्या बहुसंख्य कविता अकबराला नीतिपर उपदेश करणाऱ्या आहेत.

## बलुतेदार

गावा-गावांतले विविध कारागीर व कामगार गावातल्या शेतकऱ्यांची घरगुती व शेतकामांच्या अवजारांची वगैरे कामं वर्षभर करीत असतात. आणि त्या कामांच्या मोबदल्यादाखल सुगीच्या दिवसांत शेतकऱ्यांकडून धान्य घेतात, याला म्हणतात बलुतं.

पूर्वीच्या काळी गावकऱ्यांचा मुख्य व्यवसाय शेती हा असायचा. आणि गावातले इतर लहानमोठे उद्योग शेतीला साहाय्य करणारेच मुख्यतः असत. शेतकऱ्याचा खटारा, नांगर, व शेतीची मोट, पखाल आदी

अवजारं-हत्यारं बनवणं, तशीच दुरुस्त करणं या कामांसाठी गावचे सुतार, लोहार, चांभार, मांग यांची गरज पडते. तर सांसारिक जीवनात परीट, न्हावी, कुंभार, कोष्टी उपयोगी पडतात. विणकर, कासार, महार, रामोशी यांच्याकडे त्यांची त्यांची कामं सोपवलेली असत. या लोकांना त्यांच्या कामांच्या मोबदल्यात ठराविक बलुतं मिळायचं, म्हणून त्यांना बलुतेदार म्हटलं जातं.

बलुतेदारांना पूर्वीच्या काळी कारू-नारू असंही म्हणत. बलुत्यांची ही प्रथा फार प्राचीन काळापासून चालत आलेली आढळते. सणावारानिमित्त जास्त धान्य, भाकरी, तेल, मीठ, गूळ असे गरजेचे पदार्थही बलुतेदारांना देण्याची रुढी होती. लग्नसमारंभात उपयोगी पडणाऱ्या बलुतेदारांना कापडचोपड व जेवण दिलं जाई.

ग्रामीण भागात अलीकडे कसले-ना-कसले लहानमोठे उद्योगधंदे सुरू झाले असल्यानं बलुतेपद्धत हळूहळू कमी होत चाललीय. धंद्यांचे प्रमाण वाढत जाईल तसतशी ती पद्धत अजिबात बंद होईल, अशी स्पष्ट चिन्हं दिसत आहेत.

## महान संस्कृत कवी बाणभट्ट

संस्कृत गद्यकाव्याचा प्रणेता म्हणून बाणभट्ट हा महाकवी विशेष प्रसिद्ध आहे. 'कादंबरी' या ग्रंथामुळे तो खूप नावाजला गेला आहे. याशिवाय त्यानं 'हर्षचरित' हा ग्रंथही रचला. या दोन ग्रंथांत त्यानं आपली कमी-जास्त आत्मकथा दिलेली आहे. शोण नदीच्या तीरावरचं प्रीतिकूट हे त्याचं गाव.

वेद व शास्त्रं यांचा त्याचा गाढा अभ्यास होता. राजा हर्षवर्धन याला

त्याची योग्यता कळली व त्यानं बाणभट्टाला राजाश्रय दिला. त्या राजावर त्यानं पुढं 'हर्षचरित' हा गद्यग्रंथ लिहिला.

ज्या ग्रंथावरून बाणभट्ट मुख्यतः वाखाणला गेला, त्या 'कादंबरी' ग्रंथात शृंगार, अद्‌भुत व करुण या तीन रसांचा परिपोष झालेला आहे. 'कादंबरी' हा ग्रंथ नमुनेदार गद्यकाव्य गणलं जातं.

## अप्रतिम बादामी शिल्प

कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यात बादामी हे तालुक्याचं गाव आहे. इ.स. ५४३ सालच्या शिलालेखात या गावाला वातापी नगरी म्हटलेलं आहे. वातापी नावाच्या दैत्यावरून हे नाव पडलं, असं म्हणतात. त्याच्याबद्दलची पौराणिक कथा आहे, ती अशी—

या प्रदेशात प्राचीन काळी वातापी व त्याचा भाऊ इल्वल हे दैत्य खूप माजले होते. या नरभक्षकांनी अनेक ब्राह्मणांना मारून खाल्लं होतं. अशा स्थितीत अगस्त्यमुनी दक्षिण भारतात आला. तो वैदिक धर्माचा प्रसार करीत होता. या दैत्यबंधूंना त्याचं करणं मानवलं नाही. म्हणून त्याला ठार मारण्याचा बेत त्यांनी केला. पण अगस्त्य मुनीनं त्यांच्याच मंत्रानं त्यांच्यावर मात केली व त्यांना ठार केलं.

विजापूर शहरापासून ७३ मैलांवर असलेलं बादामी हे गाव चालुक्य वंशाची राजधानी होती. या वंशातल्या राजांनी इ. स. ५५० पासून दोनेकशे वर्षं राज्य केलं. त्या वंशाच्या राजांच्या राजवटीत बादामी नगरी वैभवशाली बनली होती. त्यांनी तिथं निर्माण केलेली अप्रतिम शिल्पं आजही मन मोहून टाकतात.

बादामी इथं कितीतरी भव्य मंदिरं आहेत. मालेगिट्टी शिवालय



बाल अ.क्रमांक

(माळिणीचं शिवमंदिर) हे एका प्रचंड खडकावर बांधलेलं असून ते द्राविड शैलीचं आहे. अतिशय देखणं शिल्पकाम असलेल्या या मंदिरात देवतांच्या सुंदर मूर्ती कोरलेल्या आहेत.

गावाजवळ मोठा तलाव असून त्याला अगस्त्य तीर्थ म्हणतात. तलावाच्या काठावरचं भूतनाथाचं मंदिर खूपच देखणं आहे. या मंदिराजवळ एक प्रचंड खडक असून त्यावर अनेक शिवलिंगं, तसंच विष्णू, नरसिंह, महिषासुरमर्दिनी, शिव, गणपती, ब्रह्मा, वराह अशा काही मूर्ती कोरलेल्या आढळतात. याच खडकात एक गुहा असून तिच्यासमोर देवतेऐवजी एका राजाची भव्य मूर्ती आहे. हा राजा कोण, याची माहिती मिळत नाही. पण लोक त्याला कोष्टराय म्हणतात. त्याच्याबद्दलची दंतकथा अशी आहे, की— हा राजा कुष्ठरोगी झाला असताना इथं येऊन त्यानं अगस्त्यतीर्थात स्नान केलं. तसा तो रोगमुक्त झाला. त्याच्या इथल्या मूर्तीची काही लोक पूजाही करतात.

बादामीजवळच्या डोंगरावर चार लेणी आहेत. त्यांतलं एकेक शैव व जैनांचं आहे, तर दोन वैष्णव आहेत. शैव लेण्याच्या दर्शनी भागात अठरा हात उंच असलेली नटराजाची मूर्ती कोरलेली असून तिचं शिल्प प्रेक्षणीय आहे. आणि गुहेतल्या एका भिंतीवर अर्धनारीनटेश्वराची जी प्रतिमा कोरलेली आहे, ती तर अप्रतिमच आहे. इतर भिंतींवरही अनेक देवतांच्या आकृती कोरलेल्या आहेत.

या लेण्याच्या जरा पूर्वेकडे वैष्णव लेणी असून त्यातलं एक तर अति सुंदर आहे. या लेण्यांत विष्णूच्या विविध अवतारांच्या आकृती कोरलेल्या आहेत. त्या सगळ्याच रेखीव असल्या तरी, त्रिविक्रम, वामन व बळी यांच्या आकृतींचं शिल्पकाम भव्य तसंच विशेष सुंदर आहे. या लेण्यांच्या प्रवेशद्वारावरचे स्तंभसुद्धा अति देखणे आहेत.

जैन लेण्यांत आदिनाथ तीर्थंकराची मूर्ती एका वृक्षावर-एका

सिंहासनावर बसलेली दाखवली असून बाजूला गंधर्व सेवक आहेत. इतर अनेक तीर्थंकरांच्या मूर्तीही या लेण्यांत असून त्या देखण्या आहेत. महावीरांची मूर्ती तर भव्य आहे.

ही सर्वच लेणी रचनेच्या दृष्टीनं बौद्ध विहारासारखी दिसतात. त्यांची कारागिरी नेत्रदीपक आहे. या लेण्यांतील भित्तीचित्रं अवशेषांच्या रूपानं उरलेली आहेत. तरीसुद्धा ती अपुरी चित्रंसुद्धा कलेच्या दृष्टीनं उत्कृष्ट दर्जाची आहेत. अर्थातच मूळ चित्रं याहून कितीतरी अधिक सुंदर असावीत, असं खात्रीनं वाटतं. असंच एक चित्र शिव-पार्वती विवाहाचं असून ते खूपच मनोवेधक आहे. एकूणच बादामी येथील शिल्पकला व चित्रकला यांचा विकास चालुक्यांच्या काळात किती उच्च दर्जाला पोचला होता हे कल्पनेनं ताडता येतं.

## बृहत्कथा

---

'बृहत्कथा' हा ग्रंथ गुणाढ्य नावाच्या पंडितानं रचलेला प्राचीन कथासंग्रह आहे. तो मुळात पैशाची या भाषेत लिहिलेला आहे. सात विद्याधरांच्या दीर्घ कथा व त्यांना आनुषंगिक अशा कित्येक उपकथा या ग्रंथात होत्या, अशी माहिती मिळते. पण हा ग्रंथ मूळाबरहुकूम उपलब्ध नाही. त्याच्यातल्या काही कथा समाविष्ट केलेली 'कथासरित्सागर' व 'बृहत्कथामंजरी' या नावांची दोन संस्कृत भाषांतरं तेवढी उपलब्ध आहेत.

गुणाढ्य हा खरं तर वैदिक पंडित. तरीपण धर्माशी कसलीच सांगड न घालता त्यानं आपल्या कथा लौकिक स्वरूपाच्या रचल्या.

या कथा अद्भुत असल्या तरी, कौरव-पांडवांच्या युद्धापासून

गौतमबुद्धाच्या कालखंडापर्यंतच्या इतिहासावर त्या प्रकाश टाकतात, असं मानलं जातं.

## बोरन्हाण

---

मुलाचं आरोग्य चांगलं राहावं म्हणून अगदी लहानपणी-ते मूल वर्षाचं होण्याआधी पहिल्या मकरसंक्रांतीच्या दिवशी बोरं वगैरे काही पदार्थांचं 'स्नान' त्याला घालतात. ही एक जुनी कौटुंबिक संस्काराची रुढी. आप्तेष्टांच्या मुलांना घरी बोलावून हा सोहळा पार पाडतात. काळानुसार अलीकडे ही प्रथा फारशी कुठं आढळून येत नाही.

या सोहळ्याची पद्धत होती, ती अशी—

कापडावर खडी काढलेलं काळं झबलं मुलाला घालायचं. मग औक्षण करून, बोरं, उसाचे बारीक तुकडे, भुईमुगाच्या शेंगा, चुरमुरे हे पदार्थ एकत्र मिसळून त्या मुलाच्या माथ्यावरून त्याच्या अंगावरून ओतायचे. याला म्हणायचं बोरन्हाण. मुलाच्या अंगावरून खाली पडलेले ते पदार्थ, जमलेली मुलं वेचून खायची. सुवासिनींना हळदकुंकू द्यायचे. या संस्कारामुळे त्या मुलाला पुढचे उन्हाळे बाधत नाहीत व त्याचं आरोग्य चांगलं राहतं, असा समज हा संस्कार करण्यामागं आहे.

मुख्यतः महाराष्ट्रात पूर्वापार चालत आलेली ही प्रथा आता लुप्त होत चाललेली दिसते.

## तंपुरान कुंचिक्कुट्टन (केरळव्यास)

तंपुरान कुंचिक्कुट्टन हा केरळात एक मोठा कवी होऊन गेला. तसं याचं मूळ नाव होतं रामवर्मा. पण आई-बाप लाडानं त्याला कुंचिक्कुट्टन म्हणत. म्हणून तेच नाव रूढ झालं. पुढं तर 'केरळव्यास' म्हणून त्याची ख्याती झाली.

विद्वान असलेल्या याच्या मामानं याच्याकडून संस्कृत साहित्यशास्त्र, काव्य, नाटक इ. अनेक विषयांचं अध्ययन करून घेतलं.

संस्कृत व मल्याळम् या दोन्ही भाषांत मिळून तंपुरान यानं पन्नासेक ग्रंथ लिहिले. संस्कृत शब्द न वापरता त्यानं मल्याळम भाषेत अनेक काव्यग्रंथ लिहिले हे विशेष. 'स्यमन्तकम्', 'सीतास्वयंवरम्' अशी काही नाटकंही त्यानं रचली असून त्यानं स्फुट श्लोक तर अगणित रचले. मात्र महाभारताचा वृत्तानुवृत्त अनुवाद हा याचा सर्वोत्तम ग्रंथ. विशेष म्हणजे, केवळ ८७४ दिवसांत हे अनुवादकार्य त्यानं पुरं केलं म्हणून त्याला 'केरळव्यास' म्हणून गौरवण्यात आलं. हा ग्रंथ प्रासादिक तसाच रसाळ आहे. याच्या अनुवादलेखनाची अशी गोष्ट सांगतात की तो एकाच वेळी सहा लेखनिकांना, एकेकाला एकेक अनुवादित श्लोक तोंडी सांगत असे.

इतिहासाची आवड असलेल्या तंपुराननं 'केरल' म्हणून ऐतिहासिक खंडकाव्य लिहायला घेतलं होतं. पण त्याला अकालीच मृत्यू आल्यामुळे ते अपुरंच राहून गेलं. अवघे पाचच सर्ग पुरे होऊ शकले. केरळच्या सुरुवातीच्या इतिहासापासून आद्य शंकराचार्यांच्या अवतारापर्यंतचा भाग त्यात आलेला आहे.

बुद्धिबळ तो आवडीनं खेळायचा. गंमत अशी की— हा खेळ खेळत असतानाही हा एकीकडे कवन रचीत असे.

## शिखांचे चार मुख्य तख्त

शिखांचे चार मुख्य गुरुद्वारे असून ती तख्त म्हणून ओळखली जातात. (१) अमृतसरचं 'श्रीअकाल' तख्त. इथं प्रख्यात हरिमंदिर आहे. (२) गुरू गोविंदसिंघ यांचं जन्मस्थळ पाटणा इथलं 'पटनासाहब'. (३) गुरू गोविंदसिंघ यांनी जिथं वास्तव्य केलं ते पंजाबातलं 'आनंदपूरसाहब.' (४) गुरू गोविंदसिंघ यांचा जिथं अंत झाला ते, मराठवाड्यातील नांदेड इथलं स्थान– हुजूरसाहब.

ही चारही स्थानं शिखांची तीर्थस्थानं मानली जातात.

## तमसा नदी

'रामायण'कर्त्या वाल्मीकी ऋषींचा आश्रम तमसा या नदीच्या तीरावर होता. ही नदी मध्यप्रदेशात महियर गावी उगम पावते आणि रेव्याच्या उत्तर भागातून वाहत जात पूर्वेकडे प्रयागपासून सुमारे १८ मैलांवर गंगा नदीला मिळते.

रामायणकालापासून पवित्र तीर्थस्थान मानल्या गेलेल्या या नदीकाठच्या आपल्या आश्रमातच वाल्मीकींनी रामायण या आद्य महाकाव्याची रचना केली, असं म्हणतात.

## महाबलिपुरम्

तमिळनाडू राज्यात महाबलिपुरम् इथं मंडप व रथ अशा स्वरूपात अनेक शिल्पं पाषाणांत कोरलेली आहेत. या शिल्पांवर अनेक देखण्या

मूर्ती कोरलेल्या असून पुराणातले काही प्रसंगही खडकांत कोरलेले आढळतात. पाषाणात मंदिरं खोदण्याचा प्रकार पल्लव राजांनी प्रथम सुरू केलेला दिसतो. महेंद्रवर्मा व नरसिंहवर्मा हे कलारसिक पिता-पुत्र इ.सनाच्या ७ व्या शतकात होऊन गेले. त्यांनीच शिल्पकलेचं हे पल्लवयुग सुरू केलं. महाबलिपुरम् इथलं शिल्पवैभव दक्षिणेतील सर्वांत प्राचीन असून ते अजून उत्तम अवस्थेत आहे.


रथ-मंदिरे – महाबलिपुरम

महाबलिपुरम् हे प्राचीन संस्कृतीचं केंद्र असून ते मद्रासपासून पस्तीसेक मैलांवर समुद्रकाठी आहे. प्राचीन काळी हे गाव बंदर म्हणून प्रसिद्ध होतं.

अर्जुनाच्या रथाच्या स्वरूपात खोदलेलं दुर्गामंदिर साधं आहे, तर धर्मराजरथ नालंदा येथील विहाराच्या धर्तीवर खोदलेला आहे.

अखंड पाषाणात कोरलेली इथली मंदिरं वैशिष्ट्यपूर्ण आहेत. इथल्या पहाडात खोदलेली कृष्णमंडप गुंफा कोरलेल्या चित्रांनी भरलेली आहे. गोवर्धनधारी श्रीकृष्ण वगैरे इथलं कोरीव शिल्प अप्रतिम असं आहे.

या गुंफेपाशीच पंचपांडव रथ आहेत. पाहणाऱ्याला शिल्पाची गतिमानता प्रत्ययास आणून देणारी ही शिल्पं 'रथ' नावाची सार्थता पटवतात. द्रौपदीचा रथ हे दुर्गामंदिर असून त्यात दुर्गेची मूर्ती आहे.

इथून काही अंतरावर तीन मजली मंदिर दगडात कोरलेलं आहे. गणपतीची मूर्ती असलेल्या या सुंदर मंदिराला गणेशरथ म्हणतात.

## वेल्लोरचा नमुनेदार दुर्ग

तमिळनाडूच्या उत्तर अर्काट जिल्ह्यात पलार नदीच्या काठावर वेल्लोर हे गाव असून तिथं एक नमुनेदार दुर्ग आहे. १३ व्या शतकात बांधलेल्या या दुर्गाभोवती खंदक असून दुर्गाच्या आत जलंधरेश्वराचं विशाल तसंच देखणं मंदिर आहे. सातमजली गोपुर असलेल्या या मंदिराचं शिल्पकाम अप्रतिम आहे.

## उंच पहाडावर बांधलेला दुर्ग

कावेरी नदीच्या तीरावर तंजाऊरपासून ३५ मैल अंतरावर तिरुचिरापल्ली हे वैशिष्ट्यपूर्ण नगर आहे. पावणेतीनशे फूट उंचीच्या उभ्या पहाडावर बांधलेला दुर्ग हे इथलं मुख्य प्रेक्षणीय स्थळ. या दुर्गात पूर्वी हजारखांबी मंडप होता. तो ढासळला आहे. दुसरा-- शंभरखांबी मंडप मात्र अजून तिथं आहे. पहाडात तीन गुहामंदिरं खोदलेली असून त्यांचं कोरीवकाम देखणं आहे.

## तक्षशिला- आद्य व श्रेष्ठ विद्यापीठ

भारताच्या वायव्य सीमेवर प्राचीन काळी गांधार नावाचा देश होता. त्याची राजधानी होती तक्षशिला नगरी. ज्ञानपीठ-विद्यापीठ म्हणून याची

विशेष ख्याती होती. इसवी सनापूर्वी ८०० ते इ.स. ४०० एवढ्या— तब्बल बाराशे वर्षांच्या दीर्घ कालावधीत इथल्या विद्यापीठानं अखंड ज्ञानसत्र चालवलं. म्हणजेच एका परीनं हे जगातलं आद्य तसंच श्रेष्ठ विद्यापीठ होय.

एकेका शास्त्रातले पारंगत विद्वान या विद्यापीठात अध्यापनाचं कार्य करीत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ते तत्परतेनं काम करीत. म्हणूनच देशातल्या विविध भागांतून तसेच देशाबाहेरूनही अनेक विद्यार्थी या विद्यापीठात आवर्जून येत. महापंडित आर्य चाणक्य व आयुर्वेदाचार्य जीवक हे अनेक वर्षं इथं अध्यापक म्हणून होते.


एकूण विद्याशुल्क म्हणून धनवान विद्यार्थ्यांकडून इथं हजार सुवर्णमुद्रा घेत असत; तर गरीब विद्यार्थ्याला काहीही शुल्क न घेता शिकवीत असत. वेद, वेदांगं, व्याकरण, वैद्यक, स्थापत्य, विविध कला, युद्धशास्त्र इ. अठरा विषयांचं शिक्षण इथं देत असत. आपापल्या आवडीनुसार प्रत्येक विद्यार्थी विषय निवडी. प्रत्येक विषयाचं तात्त्विक तसंच प्रात्यक्षिक शिक्षण देत असत. मुख्य विषयांच्या अनुषंगानं येणारे इतर विषयही शिकवीत.

इ.सनाच्या पाचव्या शतकाच्या उत्तरार्धात भारताबाहेरच्या रानटी टोळ्यांनी आक्रमण केलं, तेव्हा या नगरीबरोबरच इथलं विद्यापीठही त्यांनी नष्ट केलं.

## तुणतुणं

तुणतुणं म्हणजे एक साधं, एकतारी वा दुतारी तंतुवाद्य. याची तार छेडल्यावर तुण्-तुण् आवाज होतो, म्हणून या वाद्याला तुणतुणं म्हणतात.


साधारणपणे दीडेक वीत उंचीचं व टीचभर व्यासाचं पोकळ लाकडी नळकांडं घेतात. त्याला खालच्या पोकळ भागाला चामडं मढवतात. त्या चामड्याच्या मधोमध तार गुंतवून वर घेतात. नळकांड्याला एका बाजूला बांबूची तीनेक फूट उंचीची एक दांडी तिरकस जोडतात. या दांडीच्या वरच्या टोकाशी एक वा दोन खुंट्या जोडलेल्या असतात. नळकांड्यातून तार वर घेतली जाते व ती वरच्या खुंटीला गुंडाळली जाते. दोन तारा असल्यास त्या दोन खुंट्यांना गुंडाळतात. तार वा तारा छेडताच कमी-अधिक उंचीचा सूर निघावा यासाठी खुंटी पिळतात व तारेला कमी-अधिक ताण देतात.



तुणतुणे

तुणतुण्याची दांडी धरणाऱ्या हाताच्या अंगठ्यालगतच्या बोटानं— तर्जनीनं तार छेडतात. नाहीतर एका हातात दांडी धरून तुणतुणं सावरत, दुसऱ्या हातातल्या टणक काडीनं तार छेडता येते. या तुणतुण्यातून 'तुण्-तुण्' हा एकच स्वर कमी-अधिक उंचीचा निघू शकतो. पोवाडे गाणाऱ्या शाहीराचे साथीदार, तमाशातील गाण्याचे साथीदार, गोंधळी, भुत्ये आदी मंडळी तुणतुणं वाजवतात. दक्षिण भारतात हे वाद्य 'तुंतिण' म्हणून ओळखलं जातं.

साधारणपणे चंद्रकोरीच्या बाकदार आकाराचं असं हे पितळी नळकांड्याचं वाद्य असतं. याचं एक टोक निमुळतं होत गेलेलं असं अगदी बारीक बनवतात, तर दुसऱ्या बाजूला रुंदी थोडीथोडी वाढत जाते. शेवटी त्या टोकासी रुंदसा छोटासा कर्णा जोडतात. निमुळतं टोक ओठांशी दाबून धरून 'शिंग' म्हटली जाणारी ही तुतारी, शिरा ताणीत जोरात फुंकतात. 'तुतूर . . तुतूर . .' असा ध्वनी उमटत असल्यानं या वाद्याला तुतारी असं नाव पडलं. बैलाच्या वाकड्या, बाकदार शिंगासारखा याचा आकार असल्यानं याला 'शिंग' असंही म्हणतात.



शिंग / तुतारी

तुतारी : एक प्रकार

पूर्वी युद्धाच्या सुरुवातीला शिंग फुंकण्याची प्रथा होती. मंगल वा धार्मिक प्रसंगांच्या वेळी तुतारी फुंकतात. तसंच देवालयातून देवतांच्या पालख्या निघतात, त्या मिरवणुकांच्या वेळी, लग्नसमारंभात वगैरे तुतारी

वाजवतात.

पुराणात या वाद्याला 'तूर्य' म्हटलेलं आढळतं.

## तेन्नालीराम

तेन्नालीराम हा चतुर व हजरजबाबी असा तेलगू कवी होऊन गेला. त्याचा काल निश्चित असा माहीत नाही. पण १५ व्या किंवा १६ व्या शतकात तो होऊन गेला असावा, असा तर्क आहे.

आंध्रातील कृष्णा जिल्ह्यात तेन्नाली गाव आहे, हे त्याचं जन्मगाव. अल्पवयातच म्हणजे अवघ्या बाराव्या वर्षी हा विद्वान पंडित बनून संस्कृत व तेलगू भाषांत काव्य रचू लागला.

बिरबलासारखा हा चतुर होता. त्याच्या चातुर्यासंबंधीची एक कथा प्रचलित आहे, ती अशी—

विजयनगरचा राजा कृष्णदेवराय याच्या पदरी दरबारात तेन्नालीराम असतानाची गोष्ट : राजाची म्हातारी आई मरणाच्या पंथाला लागली असताना तिला आंबा खावासा वाटला. आंबे आणायला राजानं सेवक पाठवले. पण आंबे घेऊन सेवक परत येण्याआधीच ती मरण पावली.

या प्रकारानं राजा दुःखी झाला. आईच्या अपुऱ्या राहिलेल्या इच्छेची पूर्ती कशी करता येईल, असं त्यानं ब्राह्मणांना बोलावून विचारलं. ब्राह्मणांनी राजाला सांगितलं की— सोन्याचे आंबे बनवून घ्यावेत आणि ते ब्राह्मणांना दान द्यावेत.

त्याप्रमाणे राजानं केलं. तर, ब्राह्मणांचा हा स्वार्थी कावा तेन्नालीरामाला रुचला नाही. त्या स्वार्थी ब्राह्मणांना नामी धडा शिकवण्याचं त्यानं योजलं. आपल्या आईच्या इच्छेखातर म्हणून त्यानं

ब्राह्मणांना दानधर्म करायला आपल्या घरी बोलावलं आणि एकेका ब्राह्मणाला तापलेल्या लोखंडी सांडशीनं डाग द्यायला सुरुवात केली. एका ब्राह्मणाला हा प्रसाद मिळताच बाकीचे ब्राह्मण तिथून सटकले. ज्याला डाग दिला होता, त्याला घेऊन ते आरडाओरडा करीत राजाकडे गेले आणि तेन्नालीरामाविरुद्ध त्यांनी राजाकडे तक्रार केली. राजानं तेन्नालीरामाला बोलावून घेऊन जाब विचारला. तेव्हा तो साळसूदपणे राजाला म्हणाला—

"महाराज, माझ्या आईला मरतेवेळी वाताची पीडा झाली होती. त्यामुळे तिच्या हाता-पायांना झटके येत. त्यांवर उपाय म्हणून वैद्यानं तिला डाग द्यायला सांगितलं. आईही त्या गोष्टीला कबूल झाली. पण तिची ती इच्छा पुरी होण्याआधीच ती मरण पावली. तिची इच्छा पुरी करायला आता काय करता येईल ?— असा विचार मी करू लागलो. तेवढ्यात सोन्याचे आंबे ब्राह्मणांना दान करून तुम्ही तुमच्या आईची इच्छा पुरी केलीत असं कळलं. इच्छेनुसार ब्राह्मणांना दान करण्यानं इच्छापूर्ती होते ना ? मग, माझ्या मेलेल्या आईची इच्छा पुरी करण्यासाठी मी ब्राह्मणांना डाग दिले, तर त्यात काय बिघडलं ?"

तेन्नालीरामाच्या या चातुर्याचं राजानं कौतुक केलं. त्या स्वार्थी ब्राह्मणांना धुडकावून लावलं.

'पांडुरंगमाहात्म्य' हा ग्रंथ तेन्नालीरामनं रचला आहे.

## दंतकथा

सांगोवांगी, तोंडातोंडी पसरत रूढ झालेल्या आख्यायिका म्हणंजे दंतकथा. काही स्थानिक, काही ऐतिहासिक, तर काही देव-देवतांविषयी

अशा नाना तऱ्हेच्या दंतकथा कानावर येतात. लिखित असा आधार नसलेल्या अशा या कथा असतात.

संस्कृतात उदंत (वार्ता या अर्थी) शब्द आहे, त्यावरून उदंतकथा— (ऐकीव गोष्ट) शब्द रूढ होऊन, पुढं सुरुवातीचं 'उ' अक्षर लुप्त होऊन दंतकथा शब्द रूढ झाला, असा तर्क आहे.

'स्थानिक कथा' या प्रकारात ऐतिहासिक व्यक्तींबद्दल किंवा घटना-प्रसंगांबद्दलच्या कथा येतात. तशाच स्थलासंबंधीच्या ऐकीव कथा-आख्यायिका, गुप्तधन, भुतंखेतं, झपाटलेली घरं वा विहिरी किंवा झाडासंबंधीच्या आख्यायिका येतात. यांपैकी काही गावापुरत्या, तर काही त्या प्रदेशापुरत्या मर्यादित स्वरूपात पसरलेल्या असतात.

सूक्ष्मसा झाला तरी इतिहासाचा धागा दंतकथेत असतो. कित्येकदा संबंधित व्यक्तीबद्दल अतिशयोक्त वर्णन दंतकथेत केलेलं असतं. कधी कधी एखाद्या व्यक्तीला देवतास्वरूप देऊन ती कथा— दंतकथा, दैवतकथा बनवली जाते. प्राचीन भारतात अगस्त्य मुनीनं काही कौतुकास्पद कार्य केलं, तर त्याला अद्भुताची पुटं देऊन त्यांची जशी काय दैवतकथा बनवलेली आहे. परशुरामाची अशीच दैवतकथा बनवण्यात आली; एवढंच नव्हे, तर त्याची मुळी अवतारांतच गणना झाली. राम आणि कृष्ण यांच्याबद्दलच्या इतिहासाची दंतकथाही पुढं परंपरेनं दैवतकथांत परिणत झाली असावी असं दिसतं. या कर्तबगार पुरुषश्रेष्ठांना अद्भुताचं वलय गुंडाळून त्यांना प्रथम ईश्वराचे अवतार आणि म्हणून मग प्रत्यक्ष देवच मानण्यात येऊ लागले.

□

BVBK-0402696

२११६ दिनांक २२।१।१२
ग्रा.वा.